# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २२/०८/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २२/०८/२००३ रोजी सभा सुचना क्र. १४ दि. १९/०८/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सभापती |
| २) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ३) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ५) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ८) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| ९) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| १०) | श्री. नितीन गो. ठाकूर | सदस्य |
| ११) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सदस्य |
| १२) | श्री. हॅरल बोर्जीस | सदस्य |
| १३) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १४) | श्रीम. रिटा शहा | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |

### रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य आपल्या सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला सुरुवात करण्यात यावी.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२४ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

अध्यक्ष महोदय पान क्र.३ वर डॉ. बावस्करांनी म्हटले आहे, ठेकेदाराबरोबर जे ॲग्रीमेंट करणार आहोत त्यावर आपण स्थायी समितीच्या सदस्यांची स्वाक्षरी घेणार आहोत. पण आपल्या कोणाकडुन स्वाक्षरी घेतली नाही असे मला वाटते.,

**प्र. सचिव :-**

करारनामा झालेला नाही.

**नितीन ठाकुर :-**

स्थायी समितीच्या सभेला सर्व अधिकारी उपस्थित असले पाहिजेत.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त)**

आज नर्स व डॉक्टर यांचे इंटरव्ह्यु आहेत व ते मुलाखतीकरिता नगरभवन येथे गेले आहेत असे त्यांनी मला कळविले होते.

**मा. सभापती :-**

सर्व अधिका-यांना आपण सूचना दया की सभेला उपस्थित राहिले पाहिजे.

**प्र. सचिव :-**

करारनामा झालेला नाही. करारनामा झाल्यानंतर स्थायी समितीला दाखविण्यात येईल.

**धनराज अग्रवाल :-**

पान क्र. ९ वर सभापती महोदय जो ठराव झाला आहे ती सर्वानुमते मंजुर असे दिले आहे. पण त्या ठरावाला आम्ही विरोध केला होता.

**मा. सभापती :-**

सर्वानुमते ऐवजी बहुमताने लिहा.

**धनराज अग्रवाल :-**

बहुमताने लिहा. पण तुम्ही त्यात विरोध करण्याचे नाव लिहा. ह्याच्यात कुठला लफडा निघाला तर कोणी विरोध केला असे आले तर कोणीही सांगु शकेल आम्ही विरोध केला होता. तुम्ही विरोध करणा-यांचे नाव लिहा.

**मा. सभापती :-**

विरोध नावासह नोंदविण्यात यावा.

**चंद्रकांत वैती :-**

पान क्र. १२ वर प्रकरण क्र. १०५ आहे त्यात माझा असा आक्षेप होता पाणी खात्याचे लोक अशी निविदा काढु शकतात का? आणि अक्षरक्षः आपण असे अगदी जाणीवपूर्वक माझी स्टेटमेंट बदलली आहे. कारण सभापती साहेब आपण शक्यतो रुलिंग दया असे मी कधीही असा शब्द वापरत नाही. तुमच्या माहितीसाठी मी सांगतो की त्यावेळेला सन्मा. उपआयुक्त केळकर साहेब ह्यांनी त्यावेळेला सांगितले की बांधकाम खात्याशी चर्चा न करता अशाप्रकारचा निविदा काढता कामा नये असे सांगितले होते. पण आपण येथे सरळ लिहिलेले आहे दशोरे साहेब सांगतात साहेब पण सिव्हील इंजिनियर आहेत व आम्हीदेखील सिव्हील इंजिनियर आहोत. अशी चर्चा अजिबात झाली नव्हती. सभागृहात कोणीही सदस्यांनी सांगावे की अशा प्रकारची चर्चा येथे झाली.

**शरद पाटील :-**

साहेब, दशोरेजी बोलले होते की आम्ही सिव्हील इंजिनिअर आहोत आणि ते ही सिव्हील इंजिनिअर आहेत. असे ते सभागृहात बोलले होते.

**चंद्रकांत वैती :-**

पण मा. उपआयुक्त साहेब बोलले होते की बांधकाम खात्याशी चर्चा न करता कोणीही अशाप्रकारची निविदा काढु शकत नाही.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

माझ्या बाजुला दोन्ही अधिकारी उपस्थित होते. वैरागडे साहेब आणि दशोरे साहेब पण होते. त्यांनी दोघांनी सांगितले की ते पण सिव्हिल इंजिनिअर असल्यामुळे ते त्यांच्या कामापुरते मर्यादित त्यांच्या विभागाशी संबंधित कामे ते करु शकतात.

**चंद्रकांत वैती :-**

माझे खात्रीने चुकत नाही. वैरागडे साहेबांनी कुठल्याही प्रकारचे स्टेटमेंट असे केले नाही तर आपण तेवढे औचित्य आणि सौजन्याने दाखवुन ते हया इतिवृत्तांतामध्ये घेतले असते. पण तसं काय इतिवृत्तांतात घेतले नाही.

**शरद पाटील :-**

वैरागडे साहेब बोलले ते माहित नाही. पण दशोरेजींनी सभागृहाला सिव्हील इंजिनिअरची माहिती दिली होती.

**चंद्रकांत वैती :-**

अशी निविदा काढता येते का? आपण इतिवृत्तांतमध्ये असे परस्पर बदल करता ही आक्षेपार्ह बाब आहे. इतिवृत्तांतामध्ये माझे बोलण्याची पूर्ण पद्धतच बदलुन टाकली आहे. सिटी इंजिनिअर साहेब आपण बोला अशी निविदा काढायची प्रोव्हीजन आहे का?

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

सदरचा खर्च जर पाणीपुरवठाच्या शीर्षाखाली होत असेल किंवा बांधकाम विभागाकडे जाणार. आणि जर पाणीपुरवठा विभागाकडे आर्थिक तरतुदीनुसार खर्च होत असेल व तिथे जर तांत्रिक स्वरुपाचे अधिकारी उपलब्ध असेल तर पाणीपुरवठ्याने तसं कामकाज करण्यात हरकत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

आता मुद्दा उभा राहिला तांत्रिक स्वरुपाचा अधिकारी उपस्थित असेल. तांत्रिक स्वरुपाचा अधिकारी पाणी विभागामध्ये आपण आम्हाला दाखवा की जो बांधकामाशी संबंधित आहे.

**मा. सभापती :-**

तांत्रिक स्वरुपाचा म्हणजे बी.ई. सिव्हील जो इंजिनिअर असेल कारण बांधकाम व पाणी पुरवठा विभागाला असलेले इंजिनिअर हे दोन्ही एकाच कॅटेगरीचे असतात. म्हणजे बी.ई. सिव्हील केलेले असते.

**चंद्रकांत वैती :-**

असं नाही सांगत मी तुम्हाला बी.ए.,बी.कॉम.,बी.एस.सी. हे ग्रॅज्युएशन झाले पंधरावी पर्यंतच परंतु जे सिव्हील इंजिनिअरींग करतो त्यांच्यामध्ये देखील वेगवेगळे प्रांत आहेत. पाण्याचा प्रांत वेगळा आहे. कन्स्ट्रक्शनचा प्रांत वेगळा आहे. तुम्ही माहिती घ्या. बी.ई. सिव्हील केले म्हणजे त्यांनी ते कुठल्या प्रांतात केले. हे जे येथे लिहिले गेले आहे ते संपूर्णतः चुकीचे आहे. मला पूर्ण आठवण आहे केळकर साहेबांनी त्यावेळेला रुलिंग दिले होते. रुलिंग म्हणजे त्यांनी सांगितले असा प्रकार आहे आणि त्यांच्या पण सूचनेची नोंद येथे आलेली नाही.

**शरदचंद्र वैरागडे :-**

हा जो प्रश्न येथे उपस्थित झालेला आहे. पाणी पुरवठ्याचे जे इंजिनिअर आहेत ते बांधकामाबद्दल म्हणजे कंपाऊंडच्या बाबत प्रश्न होता. त्याच्यामध्ये अशास्वरुपाचे काम करण्याचे पाणी पुरवठ्याला पूर्ण अधिकार आहेत. तसेच बांधकाम खात्याचे जे इंजिनिअर आहेत ते पण्एाी खात्याचे काम करु शकतात. कारण ते दोन्ही एकाच सिव्हील इंजिनिअरचे प्रवाह आहेत आणि त्यांना असं सेपरेट करता येणार नाही.

**चंद्रकांत वैती :-**

साहेब येथे कॉरपोरेशनमध्ये अधिकाऱ्यांवर ही जी जबाबदारी आली आहे आणि जबाबदारीने काम केले पाहिजे असे मी मानतो. परंतु ही जी गोष्ट येथे लिहिली गेली आहे ती अशी झालेलीच नाही. हे जे आपण येथे सांगता ते शक्यच नाही कारण हे बांधकामाशी संबंधित आहे. पाणी खात्याच्या हेडखाली आपण खर्च केला तरी त्याच्यामागे बांधकाम खात्याने ज्यांचें जे तंत्रज्ञ आहेत त्यांचे सुपरवीजन पाहिजे. त्यांच्याशी सल्ला मसलत पाणी विभागाने, विभागाच्या अधिकाऱ्यांनी करायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती साहेब ह्यांना जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. प्रश्न इतिवृत्तांतामध्ये जी वाच्यता झाली नाही. हा प्रश्न इतिवृत्तांताच्याबाबतीत झाला आणि सन्मा. उप आयुक्त केळकर साहेब ह्यांनी जर खुलासा केला बी.ई. सिव्हील इंजिनिअर, पाणी पुरवठा विभाग व बांधकाम विभाग असे दोन्ही खात्याकडे असतात. जर पाणीपुरवठा खात्याने त्यांच्या शीर्षाखाली कोणते काम घेतले तर ते काम त्यांनी केले पाहिजे आणि जर का बांधकाम खात्याच्या शीर्षखाली काम असेल त्याची तरतुद असेल तर ते काम त्यांनी केले पाहिजे. जर आपल्याला ह्याबाबत माहिती पाहिजे असेल तर उप आयुक्त साहेब आपण पुढच्या सभेला याबाबत सविस्तर माहिती सभागृहाला द्यावी. बांधकाम खात्यामध्ये असलेली हेड जी अर्थसंकल्पामध्ये तरतुद केलेली आहे, त्याच्याखाली असलेले हेड बांधकाममध्ये वर्ग होते आणि दुसरी हेड जी पाणी पुरवठामध्ये आहे त्याच्यात जी काय सिव्हील इंजिनिअरचे काम आहे. त्यात दोन्ही खात्याचे इंजिनिअर वेगवेगळे काम करु शकतात का नाही करु शकत ह्याची सविस्तर माहिती केळकर साहेब आपण पुढच्या सभेला आणावी. वैतीसाहेब इतिवृत्तांतामध्ये आपली जी चर्चा आहे त्या चर्चेबद्दल वाद आहे किंवा जी काय सूचना मांडायची आहे ते आपण सांगावे व तशा सूचनांची इतिवृत्तांतामध्ये आपण नोंद करुन घेतोय.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब मला काय बोलायचे आहे आपण ह्याप्रकारे एखाद्याचे संपूर्ण वाक्यच बदलुन टाकली आणि सन्मा उप आयुक्त कार्यालयीन उप आयुक्त ह्यांनी एक निर्णय दिला होता त्यावेळी तो पण त्याच्यातुन गहाळ करुन टाकला. म्हणजे आपण एवढे का पुढे गेलो. ह्याच्यामध्ये पुढे काय वाच्यता झाली असेल किती गोष्टीत ते मला माहिती नाही. परंतु त्यावेळेला सन्मा स्थायी समिती

सदस्य मिलन म्हात्रे साहेब ह्यांनी सांगितले जो फ्लाय ओव्हर ब्रीज बनतोय त्यांच्या खाली जी जागा आहे तिथे गोडाऊन बनवावे आणि त्याचा उल्लेख पुढे आला असेल. परंतु त्याबाबतीत पुढच्या सभेपर्यंत आपण योग्य ती माहिती घ्यावी अशी आपण सुचना दिली होती. सुचना कमी म्हणजे तो आदेशच होता. त्याबाबतीत किती पुर्तता झाली ते मला माहिती नाही. परंतु ह्याविषयावर मी ठाम आहे की केळकर साहेब बोलले होते की, बांधकाम खात्याशी ह्या गोष्टींचा कन्सल्ट झाला पाहिजे आणि ही वाक्यरचना माझी तर बिलकुल नाही आहे की पाणीपुरवठा विभागाकडे त्यांच्या खात्याशी संबंधित निविदा असली तरी त्यांनी बांधकाम विभागाशी चर्चा करायला पाहिजे. त्यानंतर ह्या कामाला सुरुवात करावी. यापुढे कुठल्याही खात्याला आपल्या वैयक्तीक निविदा काढता येणार नाही अशी रुलिंग दया असे मी सांगितले असे लिहिले आहे. पण असे मी कधीच सांगितले नाही. वैयक्तिक निविदा काढता येणार नाही म्हणजे या शहराचा विकासाचा सांगोपांग विचार केल्यानंतर सन्मा. स्थायी समितीला विश्वासात घेतल्यानंतर संबंधित खाते प्रमुखांनी, कमिशनर साहेबांना बरोबर चर्चा केल्यानंतरच ह्या निविदा काढता येतात. वैयक्तिक खाते प्रमुखांना निविदा काढता येत नाही. त्याच्यामुळे अशी असमंध गोष्ट मी करीन असे मला वाटत नाही. आणि भविष्यात माझ्याकडुन अशी चुक होईल असे मला वाटत नाही. साहेब आपण ते वाचुन बघा.

(मा. केळकर साहेबांनी परिच्छेदाचे वाचन केले.)

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

वैयक्तिकपणे ह्या शब्दाऐवजी त्या खात्याशी संबंधित अशी दुरुस्ती करा.

**चंद्रकांत वैती :-**

विषय झालेला आहे. पण यापुढे असे घडणार नाही याबद्दल आपण योग्य ती काळजी घ्यावी एवढीच विनंती.

**रिटा शाह :-**

साहेब हे बांधकाम विभागाचे कन्सल्टींग इंजिनिअर किंवा पाणी पुरवठा विभागाचे इंजिनिअर काम कोणीही करु दे. पण माझे असे कनफ्युजन आहे की पाणी विभागाचे असु दे पण बांधकामच्या लगत जो आपण खर्च करणार ते कुठल्या फंडामध्ये जाणार. पाणी विभागाच्या का बांधकामाच्या विभागाच्या तरतुदीमध्ये जाणार.

**मा. सभापती :-**

पाणी विभागाने काम केले तर पाणी विभागाला खर्च येणार.

**रिटा शाह :-**

बांधकामाचे काम असु दे. पण पाणी विभागाच्या तरतुदीमध्ये खर्च जाणार.

**मा. सभापती :-**

काही स्ट्रक्चर आपण पाणी विभागामध्ये तरतुद आहे आणि बांधकामामध्येही तरतुद आहे.

**रिटा शाह :-**

आपण जे बांधकाम गोडाऊनचे करणार आहे त्याला सार्वजनिक बांधकाम बोलणार का, वैयक्तिक बांधकाम बोलणार का, महानगरपालिकेचे बांधकाम बोलणार आहे.

**मा. सभापती :-**

महापालिकेचे बांधकाम म्हणता येईल. पी.डब्ल्यु.डी. बोलतो त्यात जी सार्वजनिक बांधकाम होते त्यात इमारती, शाळा ही सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये मोडतात. आणि जर समजा पाणी खात्याने टाकी बनवली तर त्याचे मेंटेनन्स कोण घेतो? बांधकाम विभाग त्याचे मेंटेनन्स करेल का पाणी पुरवठा त्याचे मेंटेनन्स करेल.

**एस. के. दशोरे :-**

पाणी पुरवठा विभाग त्याचे मेंटेनन्स घेतो.

**रिटा शाह :-**

मला देखील असेच विचारायचे आहे की, ह्या स्ट्रक्चरला आपण सार्वजनिक बांधकाम बोंलु का महानगरपालिकेचे बांधकाम बोलु. आपण ही जी वास्तु उभारणार आहे त्याला नेमके कुणाचे बांधकाम बोलणार.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

सार्वजनिक बांधकाम इमारती, शाळा हे सार्वजनिक बांधकामामध्ये मोडतात. ह्या नगरपालिकेच्या प्रत्येक प्रॉपटीवर सर्वसामान्य नागरिकांचा अधिकार असल्यामुळे ती नागरिक प्रॉपटी होईल.

**रिटा शाह :-**

मी जो काय मुद्दा उभारला आहे. त्याच्याबद्दल साहेब माझी सूचना आहे. माझे असं एक मत आहे कुठलेही बांधकाम बांधताना बांधकाम विभागाचा जो बी.ई. सिव्हील आहे त्याच्या अंडरस्टॅंडिंगने आणि डिस्कशनने कार्य केले तर ते उत्तम होईल. माझी अशी सूचना आहे की, त्या दोघांनी मिळुन ते काम करायला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आपल्या महानगरपालिकेमध्ये शहर अभियंताचे एक मोठे पद आहे. जेवढे बांधकामाचे काम आहे ते माझ्यामहितीनुसार शहर अभियंताकडे जाऊन त्यांची संमती आली पाहिजे. जर तुम्ही आरोग्य विभागाचे पाहिले तर जे गटाराचे काम आहे ते आरोग्यविभागाकडुन रिपोर्ट घेतात. पण ते काम कोण करते बांधकाम विभाग करतो. मग ह्या कामालाही बांधकाम विभागाकडुन रिपोर्ट घेऊनच काम करायला पाहिजे असे माझे मत आहे.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी आणि रिटा शहाजी ह्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर मी खुलासा करु इच्छितो की, कोणतेही बांधकाम शहर अभियंता यांनी टेकनिकल सॅक्शन दिल्याशिवाय पूर्वी आपल्याला माहिजी असेल महाराष्ट्र जीवनप्राधिकरणाकडुन टेकनिकल सॅक्शन आणत होतो कोकण भुवनला जाऊन तर ते टेकनिकल सॅक्शनचे अधिकार शहर अभियंता ह्यांना आहे. आणि त्यानुसार शहर अभियंता यांनी टेकनिकल सॅक्शन दिल्याशिवाय ते काम होणार नाही याची पूर्ण खात्री आम्ही घेतो.

**धनराज अग्रवाल :-**

शहर अभियंताकडुन टेकनिकल सॅक्शनची परवानगी घेतली आहे असे दिलेले नाही.

**रिटा शाह :-**

साहेब आपण इतिवृत्तांतामध्ये नोंद करुन घ्या. दशोरे साहेबांनी ते पाणी विभागाचे कार्य आहे ते दशोरे साहेबांनी आखलेले आहे. ते काम बरोबर आहे त्यांनी एस्टिमेशन केलेले आहे. पण सिटी इंजिनिअरच्या संमतीशिवाय त्यांनी हे काम करायचे नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हे जे संपूर्ण प्रपोझल आहे ते त्यांच्याकडे पाठवुन द्या. टेकनिकली त्याची बेसमेन्ट साईजने घ्यायला पाहिजे. पेणकर पाड्याच्या येथे तलावाची संपुर्ण भिंत कोसळलेली आहे. पण त्याच्यामध्ये अजून काही निर्णय झालेला नाही. नगरपालिकेचे लाखो रुपये फुकट गेले. येथे फक्त चर्चा होते आणि पुढच्या सभेला विषय घ्यावा असे ठरते पण पुढे त्याच्यावर काहीच कार्यवाही होत नाही. एकाही निर्णयाचा सोक्षमोक्ष लागला असेल तर आपण तसे सांगुन द्यावे त्या शहर अभियंत्याकडे तुम्ही हे पाठविले त्याच्यावर त्यांनी सेक्शन दिले का? त्याच्यावर काय अभिप्राय दिला आहे का? तसं दिले असेल तर आपण सांगावे की शहर अभियंताचे असे असे अभिप्राय आहे. अभिप्रायाबद्दल कोणीच बोलत नाही. त्याचा तुम्ही खुलासा करा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब की, जेव्हा कोणत्याही कामाची निविदा आणि मंजुरी सभागृहापुढे असते त्याप्रमाणे ते काम आर्थिक मंजुरी आणि टेक्निकल सेक्शन आहे ते सॅक्शन सिटी इंजिनिअर करतो. पाणी खात्याचे किंवा आरोग्य खात्याचे काम असु दे त्यांचे स्ट्रक्चरवर जेव्हा काम येतो तेव्हा टी.एस. महानगरपालिकाच घेते. पाणी खात्यामध्ये जर एखादी भिंत उभारायची असेल त्यांचे जे बांधकामाचे सॅक्शन येईल ते कुठे होते? ह्याच्यापुढे ते बांधकामाकडे झाले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, वैरागडे साहेब आता क्लेरीफिकेशन दयायला उभे होते. तेव्हा त्यांनी सांगितले नाही. की हया कामाला मी सॅक्शन दिले आहे. असे जर त्यांनी क्लेरीफिकेशन दिले असते तर एवढा वाद चालला आहे तो वाद चाललाच नसता त्यांनी जर सही केली तर सर्वस्वी जबाबदारी ही त्यांचीच आहे. उदया समजा ती भिंत कोसळली तर आम्ही त्यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी करु त्यांनी जो निर्णय दिला आहे तो आम्हांला मान्य आहे. पण हयाप्रकरणामध्ये ते कुठेही बोलेले नाही हे माझ्या हाताखालुन प्रकरण गेले आहे. त्याची आम्ही पाहणी केली आहे व त्याला आम्ही मंजूरी दिली आहे असं ते बोलेले नाही ते आता आमच्या समोर आले आहे. दशोरे साहेबांनी आपल्या पॉवर्स मध्ये काम घेतले हे चुकीचे आहे. आपल्याकडे एखादा सक्षम अधिकारी असताना त्याच्या खालचा अधिकारी निर्णय घेतोय तो

कुठल्या बेसवर? सिटी इंजिनिअर कशासाठी बसले आहेत. इंजिनिअरला अधिकार आहे ते अधिकार दशोरेजीना नाही एवढेच आम्ही बोलतो.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

मिलन म्हात्रेजी आपण जो मुद्दा उपस्थित केला त्याप्रमाणे कोणत्याही निविदा अभियंता यांच्याकडुन तांत्रिक मंजुरी मिळाल्याशिवाय कोणत्याही विभागाकडुन परस्पर केले जाणार नाही याची दक्षता घेण्यात येणार व त्यासंबंधिचे आदेश आजच्या आज खात्याला देण्यात येतील.

**मिलन म्हात्रे :-**

आपण हे जे असे रुलिंग दिले आहे असे रुलिंग सभापतींचे पाहिजे. आपण जर ही प्रोसिडिंग पाहिली तर कुठेही सभापतींचे रुलिंग नाही आहे.सभापतींचा निर्णय काय? तर शुन्य आपण आम्हाला आतापर्यंतची प्रोसिडिंग दाखवा. आम्ही प्रत्येक वेळी सभापती साहेब ह्याविषयावर आपली रुलिंग काय असे विचारतो. सभापती साहेब आपण ह्या सभेचे पीठासन अधिकारी आहात. पिठासन अधिकारी हा निर्णय देण्याकरिता असतो.

**आसिफ शेख :-**

आपली ही स्थायी समितीची सभा आहे. इट इज गर्व्हनींग कमिटी म्हणजे व्यवस्थापन समिती आहे. ह्या ठिकाणी सर्व विभाग प्रमुख आहेत त्यांनी सभेला बसायचे असते का अन्य लोकांनी सभेला बसायचे.

**मा. सभापती :-**

विभाग प्रमुखांनी सभेला बसायचे आहे आणि आवश्यक असेल तर संबंधित अधिकाऱ्याला विभाग प्रमुखाने पाचारण करायचे आहे.

**आसिफ शेख :-**

ह्याठिकाणी विभागप्रमुखांच्या अतिरिक्त अन्य कोणी असेल तर तुम्ही त्यांना बसायला देऊ नका.

**मा. सभापती :-**

आपण सुचविल्याप्रमाणे तशी पद्धत आचरणात आणू.

**आसिफ शेख :-**

आपण सांगितल्याप्रमाणे आवश्यकता असेल तर ठिक आहे. त्यांना सभेत बसण्याची आपण परवानगी द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण स्वतःचे स्वतः जरा अवलोकन करा. आपण वर्षभर येथे स्थायी समितीची सभा चालविली चांगले चांगले कटु निर्णय झाले आपल्यावर टिका झाली, प्रशंसा झाली सर्व झाले. परंतु हयापूर्ण वर्षभरात सुरुवातीपासुन ते अंतपर्यंत लॅन्डमार्क डिसीजन काय ते सुद्धा महत्त्वाचे आहे. आपल्या राजकीय भवितव्याकरितासुद्धा महत्त्वाचे आहे. ही जी प्रोसिडिंग आहे ती न्यायप्रविष्ठ बाब आहे त्याला एक घटनात्मक स्वरुप मिळते. अशा हया संपुर्ण प्रोसिडिंगमध्ये आपल्या बरोबर सचिव आहेत, उपसचिव आहेत. पण एकाही प्रोसिडिंगमध्ये सभापतींचा कुठेही निर्णय आलेला आहे की, हया विषयावर काय रुलिंग दिली. आता ह्या प्रोसिडिंगमध्ये माझ्या विषयावरच आहे की, पुढच्या सभेत निर्णय घ्यायचा आहे. पण पुढच्या सभेत तो निर्णय घेऊन नेतर मग सभा सुरु झाली पाहिजे. मागच्या वेळेला आपण सभेतुन निघुन गेलात. त्यावेळी आपण चौहान साहेबांना ॲाडिशनल चार्ज देऊन गेलात. पण हे सांगुन गेला नाहीत की, म्हात्रे साहेब जे आरोग्य विषयक बोलताहेत तो फार महत्त्वाचा विषय आहे. आपल्याकडे कावीळ, अतिसार, हगवण, मलेरिया ह्यांच्या साथी चालु आहेत. मी त्यादिवशी तुम्हाला एवढे कळकळीने सांगितले. पण आपण ह्यावर निर्णय न देता निघुन गेलात. त्यावेळी मला फार वाईट वाटले. म्हणजे आरोग्याच्या दृष्टीकोनातुन आपण हा निर्णय घ्यायला पाहिजे. पण त्याचा निर्णय अजुन आलेला नाही. आज आपल्याकडे लहानलहान मुले आजारी पडतात आणि आपल्यकडे लहान मुलांचे हॅास्पीटल नाही आहे. डिस्पेनसरी पूर्ण भरलेल्या असतात. माझ्याबरोबर आपण या आणि बघा हॅास्पीटलमध्ये किती गर्दी असते. ज्या विषयावर दोन मिटींग झाली त्यांचा अजुन निर्णय नाही. मग आपण येथे कशाला सभा बोलावतो. आपण निर्णय दिला तर चांगले झाले असते मी माझे वैयक्तिक असं येथे काहीच मागत नाही, या शहराकरिता मागतोय. आपण जे काम ह्या शहराचा लोकांकडुन घेतोय आणि त्याने महानगरपालिका चालतेय. ही जी वाईट परिस्थिती आहे ती बघुन मला अक्षरक्षः कीव येते. सभाग.हात माझ्या पेक्षाही नगरसेवक ह्या नात्याने सिनिअर होत. कोलासो साहेब हे ही होते. पण त्यांनी देखील काही ह्याविषयात रस दाखविला नाही. लोकांनी आपल्याला मत दिले

म्हणुन आपण येथे बसलो आहोत. जेव्हा त्या मतदारांचा प्रश्न येतो त्यावेळी कोणच बोलायला तयार नाही. आपलं मागच्या सभेला ठरले होते की पुढच्या सभेत ह्याविषयावर निर्णय झाला पाहिजे. डी.एम.सी. साहेब मी तुम्हालाही सांगतो. आरोग्याच्या दृष्टीकोनातुन कुठेही अंडरस्टॅडिंग किंवा कॉम्परोमाईजसुद्धा नाही. काय आपण केले? फक्त त्या मेडिकल ऑफिसरकडे लिक्वीड क्लोरीन आले, बाकी शुन्य. आपण तपासणी केली का? कुठे मेडिकल कॅम्प लावले का? तर नाही. डी.एच.ओ. आहेत त्यांची आपण (डिस्ट्रीक्ट हेल्थ ऑफिसर) त्यांची टीम घेतली का? माझ्या वार्डामध्ये मी दोनदा जिल्हापरिषदांच्या डॉक्टरांना घेऊन मी कॅम्प लावले व तपासणी केली. मी माझ्या वार्डाचे केले पण पूर्ण शहराचे काय. माझी अशी अपेक्षा होती की, मा. सभापती साहेब ह्यांच्याकडुन अशी रुलिंग यायला पाहिजे होती की, ह्या आठवड्यामध्ये आपण जिल्हा परिषदांच्या डॉक्टरांना पाचारण करू व ज्या विभागात त्रास असेल तिथे चेकिंग करू. सभागृहाचे काम असे नाही चालले पाहिजे अशी माझी इच्छा आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेबांनी ह्यांनी आपली जी खंत व्यक्त केली आहे. शहरामध्ये आरोग्याच्या दृष्टीकोनातुन पाण्यापासुन जे काय लोकांना आजार होत आहेत ते होऊ नये याबाबतीत आपण मागच्या सभेमध्ये ज्या सिमेंटच्यापाईप लाईन जुन्या आहेत ते बदली करण्याचे काम सुरु केलेले आहे. त्यानंतर ज्या पाच डिस्पेन्सऱ्या चालु करायच्या आहेत त्याबाबत आज डॉक्टरांची इंटरव्ह्यु आहे आणि त्याकरिताच डॉ. बावस्कर आज गेले आहे. लवकरच वेगवेगळ्या विभागात पाच डिसपेन्सऱ्या सुरु करणार आहोत. आज डॉक्टरांची इंटरव्ह्यु होतील आणि ताबडतोब हफ्त्याभरामध्ये प्रत्येक ठिकाणी महानगरपालिकेचे डॉक्टर उपलब्ध झाले तर अशा माध्यमातुन आपण शहराचे काम करणार आहोत व ह्या हॉस्पीटलच्या माध्यमातुन आपल्यालाही कॅम्प घ्यायला पाहिजे. उपआयुक्त साहेब मी आपणांना सांगतो की असे कॅम्प या शहरात लावावे आणि साथीचे जे आजार आहेत किंवा अन्य रोग त्याला आळा, पायबंद आपण घालु शकु. मिरा भाईंदर शहरामध्ये ज्या पाच डिसपेन्सऱ्या होणाऱ्या आहेत त्यामाध्यमातुन नवीन उपक्रम आपण ह्याशहराला देणार आहोत. तसेच मघाशी ज्या विविध सदस्यांनी ह्या चर्चेत सहभाग घेतला त्यात ह्यापुढे कोणत्याही खात्याचे बांधकाम होत असेल तर टी.एस. हे सिटी इंजिनिअर मान्यतेने झाले पाहिजे. ज्यावेळी टी.एस. हे सिटी इंजिनिअर आपल्याकडे सँक्शनसाठी येईल त्यावेळी त्यात तुमचा सहभाग होईल. अशा पद्धतीने पुढची कामे करण्यात येईल असे मी येथे सभागृहाला सुचवितो.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब मी आरोग्याच्या दृष्टीकोनातुन बोलतोय. मागच्या वेळेला आपण जी कमिटी नेमली. महिना दिड महिन्यानंतर मला जे सभागृहाने काम दिले ते मी प्रामाणिक पार पाडले. वेळात वेळ काढला. ज्या ज्या वेळेला अधिकारी अवेलेबल झाले हे मी मुद्दामुन बोलतोय. एस.आय. ला आमच्या कमिटीबरोबर म्हणजे वैद्यकीय अधिकाऱ्यांना बरोबर फिरायला भारी पडायचे ते येत नसत. कांबळे माझ्याबरोबर गाडीमध्ये बसल्या जागेवरुन स्वतः डायरेक्शन ड्रायव्हरला द्यायला लागला. म्हणजे हे गाडीतुन उतरायला तयार नसतात. पहिल्या पासुनची जी प्रोसिजर चालु आहे तीच प्रोसिजर आजही चालु आहे. सगळा सर्वे झाल्यानंतर प्रत्येक दिवशी तिथे काय काय सूचना डॉक्टर साहेबांनी केल्या. आम्ही इतके फिरलो त्यात निष्पन्न काहीच झाले नाही. शंभरापैकी वास टक्के मार्क मिळाले म्हणजे वीस टक्के काम फक्त पूर्ण झाले आहे व ऐंशी टक्के काम जसेच्या तसे अपूर्ण आहे. अनेक ठिकाणी वॉटर लॉगिंगचे जे प्रॉब्लेम होते तिकडे बांधकाम विभागातर्फे सिमेंटचे पाईप लाईन टाकायला आम्ही प्रपोझल दिले. चव्हाण साहेब हे स्वतः आतच्या बरोबर होते. कुठल्या कुठल्या स्पॉटवर पाईप लाईन टाकायची आहे ते सांगितले. बऱ्याचशा ठिकाणी अजुन पाईप पडले आहे. खणुन डबकी साचली आहे. खणुन ते पाईप रस्त्याच्या खाली गेलेले नाहीत. दिड महिना कमिटीने मेहनत घेतली व त्याच्यानंतरचा आऊटपुट काय आहे तर झिरो आहे. सोसायटीने पत्र दिले आहे. सोसायटीच्या बाजुला घाण साचली आहे. पाणी साचले आहे. त्याच्यामध्ये मच्छर लारवा तयार झाला आहे आणि त्याही पेक्षा वाईट असं वाटतं मा. विरोधी पक्ष नेते, मा. सभागृह नेते, मा. सभापती, मा. महापौर ह्यांचे ज्यावेळेला फोटो पेपरात येतात पाहणी झाली, काम सर्व चांगले झाले आणि मग सोसायटीचे पत्र येतात की आमच्याकडे हे काम अजुन झालेले नाही. प्रत्येक स्पॉट वाईज मी प्रोसीजर सांगितली आहे की, आपण आपल्याकडे वही ठेवा व त्यात नोंद करा की अधिकारी कोण होते, काय सुचना आहेत त्या आपण घ्या. त्यात ज्या सुचना होत्या त्याचे ऐंशी टक्के इम्प्लीमेंटेशन अजुन झालेले नाही. कारण आजही अनेक स्पॉट असे

आहेत. आपल्याला अजुन महत्त्वाचे सांगायचे आहे. मिरा रोडला आम्ही गेलो तिथे दिड टेंम्पो मोठमोठ्या जनावरांची रक्ताळलेली हाडे बघितली आहेत. आजही तिथे ते हाडे पडलेली आहेत. पण अक्षरशः ढोर कापुन त्यांची रक्ताळलेली हाडे रेल्वेच्या कॅबिनच्या बाजुला टाकतात. उद्या जर का कुत्र्यांनी ती हाडे चावली तर वेथ नावाचा रोग पसरणार आणि त्या कुत्र्यांच्या तोंडाला एकदा का रक्त लागले तर ती कुत्री पिसाळणार त्यांना ती हाडे टाका. ठिकाण सांगतो हवे असल्यास मी तुम्हाला नया नगरला रेल्वेच्या बाजुला जे कॅबिन आहे त्याच्या बाजुला एस.आय.ला आपण विचारा तीन टेम्पो भरुन ढोरांची ताजी ताजी हाडे आणुन टाकली आहेत. कुत्री खात असतात. पण त्याचे अजुन इम्प्लीमेंटेशन झालेले नाही आहे. एखाद्या रोगाच्या साथीला आपण आमंत्रण देणार का?

**मा. सभापती :-**

कोणत्या विभागामध्ये.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा रोड येथे नया नगर आहे तेथे रेल्वेचे कॅबिन आहे. त्या कॅबिनच्या बाजुलाच राशीच्या राशी पडलेल्या असतात. आपण एक चांगले काम केले असे पब्लिकला निरोप द्यायचे असेल तर अशी आमची कमिटी नेमली त्या कमिटीचा काय रिपोर्ट झाला. कोण सदस्य गैरहजर होते, कोण हजर होते हे सगळं झालं पाहिजे.

**मा. सभापती :-**

आरोग्याच्या बाबतीमध्ये नालेसफाईच्या बाबतीत आपण जातीने हजर राहुन प्रत्येक विभागात अधिका-यांबरोबर गेलात. पण कुठल्याही पद्धतीचा रिपोर्ट आलेला नाही. काही सन्मा. सदस्यांचे माझ्याकडे याबाबत सूचना आल्या होत्या. त्या सूचनांच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने पावसाळ्याचे कच्च्या व पक्क्या नाल्याची सफाई करण्यासाठी निविदा मागवुन जे.सी.बी., पोकलन मार्फत नालेसफाईची कामे देण्यात आली होती. सदर कामी आरोग्य विभागाने पूर्ण केल्याबाबत स्थायी समिती सभेत माहिती दिलेली आहे. प्रत्येक ठेकेदाराने सदर कामासाठी मजूर, जे.सी.बी. डंपर, पोकलन किती वेळेकरिता वापरले ह्याचा तपशिल सादर केलेला नाही. सदर ठेकेदारामार्फत कमी खर्चात नालेसफाईची कामे पूर्ण केलेली असुन त्याची बिले मात्र मजुर व मशीनरीची जादा तास वाढवुन देण्यात येत असल्याबाबतची तक्रार स्थायी समिती सदस्यांनी केली असुन प्रत्येक नाल्याकरिता वापरलेले मजुर व मशीनने किती गाळ काढला व कोठे टाकण्यात आला त्याचा तपशिल मजुर व मशिनरी ह्याची चलने प्रत्यक्ष सुपरवीझन करणा-या मुकादम स्वच्छता निरीक्षक ह्याचे प्रमाणपत्र व अहवाल नावासहित आपण सादर करावी. अशा पद्धतीचे पत्र मी खात्याला दिलेले आहे. जसे आपण मघाशी बोलतात की किती नाले साफसफाई करून झाले आहेत. व कोणी केलेली आहेत आणि सोबत कोण होते. त्यांच्या स्वाक्ष-या आहेत का? त्या बद्दलची माहिती मागविलेली आहे. आणि आपण सांगितले त्याप्रमाणे काही ठिकाणी पाईप टाकायचे आहेत. ते पाईप अजुन टाकलेली नाही आहे. म्हणुन मी ही माहिती मागविलेली आहे आणि माझ्या माहितीप्रमाणे ती माहिती यायला पाहिजे पण अजुन माहिती आलेली नाही आहे. अशा पद्धतीने जी कामे आपण करायला घेतली आहे त्याचा मागोवा, पाठपुरावा करण्याचा प्रयत्न आपण करत असतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आपण बोललात ते सगळं मान्य आहे. आपल्याकडे सिटी इंजिनिअर आहे आणि ज्युनिअर इंजिनिअर जवळ जवळ पंधरा ते वीस आहेत. परंतु आजही मेन रोडच्या बाजुला जी चर खणली. त्या ज्या सोसायटीला जायला रस्ता आहे. त्याच्यात जी पाईप टाकायची पद्धती जर आपण बघावी. मा. आयुक्त, मा. उप आयुक्त, मा. सभापती जास्तीत जास्त अधिकारी ह्या रस्त्याने जातात. पाईप असे टाकण्यात आले आहे की, त्याने पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाही. आपण ही कामाची पद्धती बघावी आणि जो कोणी ठेकेदार आहे त्याला सांगावे व त्याबाबत सांगावे कारण त्यामुळे पाणी तुंबते व नागरिकांच्या तक्रारी येतात. केळकर साहेब मी जी ही परिस्थिती सांगतोय ती रस्त्याच्या मेन रोडची आहे. ज्यावेळेला आम्ही बघायला (सर्वे) करायला सुरुवात केली तोपर्यंत तिथे स्वच्छता करण्यात आली नव्हती. त्याच्यानंतर हे ठेकेदार आठवड्याभराने कामाला लागले. वीस वीस लाखाचे नालेखोदाईचे आपण काम दिलेली होते. पंधरा दिवस झाले होते. त्यावेळी वर्क ऑर्डर इश्यु केली नव्हती. पावसाळा जवळ आला असताना पाहणी करायला सुरुवात झाली तेव्हा त्याच्य तिस-या दिवशी चर खणायला सुरुवात झाली. त्या ठिकाणी सुद्धा चर अजुन बंद केलेले आहेत. त्या मशीनच्या चर जाऊन बघा त्या अजुनही बंद आहेत. त्यात काही बिल्डर लोकांनी मुद्दामहून बंद केले आहेत. वीस लाखाचे काम काढलं

त्यात प्रोव्हीजन काय?शहरातल्या पाण्याचा निचरा झाला पाहिजे हे प्रोव्हीजन आहे. परंतु बराचशा ठिकाणी अजुनही काम अपूर्ण राहिले आहे. तुम्ही सांगा साहेब मी तुमच्याबरोबर अजुनही एकदा यायला तयार आहे. आम्ही ह्या स्पॉटला ही सूचना दिली होती व ते काम अजूनही झाले नाही. तुमच्या त्यांच्याकडुन डायऱ्या काढा. त्याच्यावर सूचना आहे व माझी सहीदेखील आहे.

**दिनेश नलावडे :-**

येथे सभेत आरोग्य विषयक बोलले जात आहे. परंतु सभापती साहेब, आरोग्याचे अधिकारी सभेत उपस्थित दिसत नाही.

**मा. सभापती :-**

आज डॉक्टर व नर्सच ह्यांची इंटरव्ह्यु असल्यामुळे आरोग्य अधिकारी सभेत उपस्थित नाही.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय यहाँ पर पुछना जरूरी है। जो इतिवृत्तांत चल रहा है। जो दिवार दिवार बांधनेका विषय था वह नामंजुरी हुआ है। सिव्हील इंजिनिअर दशोरे साहब है। सिटी इंजिनिअर का परमिशन लिया है तो ठिक है। म्हात्रे साहबने जो आरोग्य के विषय मे बोला हम सब उन्ह बातों की कदर है। लेकिन आप अपना पिछला रेकॉर्ड देखिए। कही भी दुसरी वस्तु जब हमने बोली है। तब आपने हमे तुरंत बिठा दिया है। यह विषय नही है आप बैठे जायिए ऐसा कहकर। कोई भी सदस्य दो दो घंटा लेक्चर कर सकती है, मैं भी कर सकता हुँ। पाणी के विषय में यहा जो भी सभासद है वह एक घंटे तक बोल सकते है। गटर के विषय में एक एक घंटा बोल सकते है। यह सभा जो विषय विषयपत्रिकेके उपर नही है उसी पे चलानेका है क्या? या इतिवृत्तांतपर विषय चलाने का है इस बारे मे आप बोलिए। एक सदस्य बोलता है उसके लिए अलग रूल्स ऐसा है क्या? और दुसरा जो सदस्य है उसके लिए अलग रुल्स ऐसा है क्या? तीन बार यह बात हो गयी है।

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला मी ह्या विषयावर बोललो त्यावेळी निर्णयच झाला नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आम्ही देखील कित्येकदा दुसरा विषय घेतला. त्यावेळी सभापती साहेब काय बोलले, तुम्ही बसा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला बसायला तरी सांगितले पण आम्हाला बसा म्हणुन पण सांगितले नाही. मी ह्या विषयावर बोलायला नाही पाहिजे का?

**धनराज अग्रवाल :-**

माझा तसा आक्षेप नाही आहे. शहराचे हे काम आहे. विषयपत्रिकेवर विषय नाही आहे. आणि त्याविषयावर कोणा सदस्यांनी एक एक तास घालवला तर दुसरेविषय देखील त्या चर्चेत येऊ शकतात. जसे दुषित पाण्यामुळे पाण्याचे रोग होते, गटारामुळे रोग होते. पण ही चर्चा बांधकाम विभागाबद्दल होती. ती जी भिंत आहे ती भिंत कोण बांधु शकते? पाणी विभागवाले बांधु शकतात का सिटी इंजिनिअर ती भिंत बांधु शकतो. आणि सभापती साहेबांनी रुलिंग दिली की सिटी इंजिनिअरच्या परमिशनने ती भिंत बांधु शकतात. पण आपल्याला जर आता दुसरी चर्चा करायची असेल तर त्यात आम्ही ही सहभाग घेऊ.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी आपण मागच्या वेळेही अशी सूचना केली होती. पण प्रत्येक सदस्यांनी विचार केला पाहिजे. प्रत्येक सदस्याला त्या त्या विभागाची माहिती असते. इतिवृत्तांतामध्ये एखादा विषय आल्यावर त्याविषयावर मला बोलता येत नाही किंवा त्याविषयावर विचार मांडता येत नाही अशी प्रत्येक सदस्यांची भावना नाही आहे. प्रत्येक सदस्याला त्याविषयावर बोलता येते, प्रत्येक सदस्याला त्याविषयावर चर्चा केली पाहिजे असे वाटते. आणि सभागृहामध्ये जो विषय असहे त्याविषयावर चर्चा करून आपल्याला जे साध्य करायचे ते साध्य करता आले पाहिजे कमी वेळेत. मग कमी वेळेत ते साध्य केले तर पुढचे अनेक विषय आपल्याला घेता येईल. परंतु ही जी स्वातंत्रता आम्ही तुम्हाला बोलायला देतो त्या स्वातंत्र्याचा प्रत्येक सदस्याने विचार केला पाहिजे. आपण जे बोललात त्याविषयी धनराजजी माझे दुमत नाही. मघाशी मागच्या वेळेला सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी ह्यानी जो विषय काढला होता आरोगबाबत त्याविषयामध्ये तुम्ही पाण्यामध्ये कीटकजंतु पडले तर तो विषय आरोग्य विभागात जाऊ शकतो. बांधकामाची एखादी इमारत कोसळली व त्याच्या खाली माणसं मेली

तर तो ही गंभीर विषय होऊ शकतो. पण कोणता विषय गंभीर होऊ शकतो हा विषय येथे निर्माण होत नाही. धनराज अग्रवालजी आपण जी सूचना येथे मांडली त्यासूचनेशी मी सहमत आहे. येथे जो इतिवृत्तांतामध्ये विषय आहे त्याविषयावर बोलण्यात यावे व यापुढे सभा झाल्यानेतर असे विषय नोंद करुन ठेवा व सभेचे विषय संपल्यनंतर त्याविषयावर बोलायचे. आपण ह्याआधी सभा संपल्यानंतर अर्धा तास आपले जे विषय आहेत त्याविषयावर बोलायचे आहे ते विषय आपण घेत होतो हे आपल्या लक्षात असेलच व त्यासभेत त्या अधिकाऱ्याला बोलावुन समाधानकारक असे उत्तर आपण त्या सदस्याला देत होतो व पुढच्या सभेपर्यंत त्याची पुर्तता करण्यात येईल अशा पद्धतीचे कामकाज आपण करत होतो. सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी आपण जी सूचना मांडली त्याबद्दल मी आपणांस धन्यवाद देतो. ह्याच्यापुढे सन्मा. सदस्य इतिवृत्तांताची चर्चा करताना इतिवृत्तांताच्या व्यतिरिक्त विषय असेल तर तो विषय सभा संपल्यानंतर बोलूया. अशी पद्धत आपण पुन्हा सुरु करुया. आणि जो विषय सभेत चालू असेल त्याविषयावर चर्चा करावी ही पद्धत अवलंबु की सभा झाल्यानंतर आपण नोट डाऊन करुन ह्या सचिवांना कि ह्याविषयावर मला बोलायचे आहे. असे प्रत्येक विषय आपण अधिकाऱ्यांना समोर घेऊन बोलू व त्या विषयाची पुर्तता करण्यात येईल असे मी ह्याठिकाणी तुम्हाला सांगु इच्छितो.

**रिटा शाह :-**

आपण ही जी अर्धा तास चर्चा करणार ती चर्चा आपण इतिवृत्तांतामध्ये घेणार का? अशीच चर्चा करणार आहोत.

**मा. सभापती :-**

ती चर्चा इतिवृत्तांतामध्ये येणार नाही. आपण संबंधित विषयावर त्या अधिकाऱ्याला बोलावणार व त्याची पुर्तता करण्यात येईल.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण नालेसफाई विषयाचे गांभीर्य ओळखुन प्रत्येक विभागाल पत्र दिले पण त्यांनी प्रत्येक विभागाने कुठल्याही प्रकारचा रिपोर्ट सादर केलेला नाही. माझी आपणाला अशी विनंती आहे की, त्या संबंधित ठेकेदाराचे बिलदेयके त्याला अदा करण्यापूर्वी त्यापेक्षा आपण त्या विभाग प्रमुखांकडुन अहवाल मागवुन घ्या.

**मा. सभापती :-**

अकाऊंटन्ट येथे उपस्थित आहे. त्यांनी नोंद करून घ्यावी की, अशी आरोग्याची माहिती पूर्ण आल्याशिवाय बिल अदा करायचे नाहीत.

**हॅरल बोर्जिस :-**

साहेब जो अहवाल येणार आहे तो कृपया आपण स्थायी समिती समोर आणावा.

**मा. सभापती :-**

ठिक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पान नं. २५ सिरीयल नं. ७४ वर केळकर साहेब आपल्याकडे झोन पाडले आहेत. साहेब माझे असे म्हणणे का तुम्ही जे झोन पाडले आहेत १, २, ३, ४ त्यात एखादा प्रभाग तुम्हाला घेता आला नाही तर आरोग्याचे झोन असे कम से कम तुम्ही मेनशन करा. भाईंदर वेस्टला गटारावर जाळ्या बसविण्याचा ठेका देऊन टाकला. ठेकेदाराला मी काही स्पॉटवर मुले पडली जिथे ॲक्सिडेंट झाले पण त्यांनी तिथे न लावताच भलत्याच ठिकाणी लावले व त्यांनी सांगितले मला जी क्वॉंटिटी दिली आहे ती संपली तिथे आता मी लावू शकत नाही. म्हणजेच स्पेसिफिक एरिया मेनशन नसल्यामुळे आणि तो ठेकेदार संपूर्णपणे ती क्वॉंटिटी कुठेही वापरतो. आणि माझ्यामाहितीनुसार त्याने ती क्वॉंटिटी दुसरीकडे वापरुन टाकली. ही जी पद्धती आहे त्यात चांगले वाईट असे परिणाम काहीच दिसत नाही. गटाराचे काम कुठे केले म्हणजे एरिया ह्यात मेनशेन केला नाही आहे. वार्डाचे नाव नाही. भाईंदर पूर्वेला गटाराचे काम केले पण नेमके काम कुठे केले हे कळले तरी पाहिजे. अशी दोनचार प्रकरणे ह्याच्यात आहे.

**मा. सभापती :-**

अशी प्रकरणे आपण शोधुन काढा. ७४ प्रमाणे अशी अनुषंगाचे रस्ते असतील ती कामे कोणत्या ठिकाणी झाली आहे ते ठिकाणची माहिती पुढच्या सभेत आणायची आहे.

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. १२४ दि. १८/७/०३ रोजीचे इतिवृत्तांत दुरुस्तीसह कायम करण्यास ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडतो.

**प्रकरण क्र. १२४ :-**

दि. १८/७/०३ रोजीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १०७ :-**

दि. १८/०७/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हरेश गावंड. अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.१२५ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. १२५ सुरु करण्यापूर्वी एक महत्त्वाची बाब मी सभागृहाच्या निर्दशनास आणू इच्छितो. आपल्या पालिकेतर्फे सर्व नागरिकांना एक पत्र देण्यात आले आहे की, जर आपण आपल्या कराचा भरणा एकत्रितपणे आणून पालिकेला द्यायचे होते असे सक्ती करण्यात आली आहे ही अशी सक्ती योग्य आहे का? आणि जर कर भरला नाही तर पाणी कनेक्शन कापू असे एक पत्र संपूर्ण शहरातील सर्व नागरिकांना व सोसायट्यांना पाठविण्यांत आले आहे.

**मा. सभापती :-**

आपल्या सुचना असतील ज्या विषयाच्या त्या आपण नंतर मांडूया.

**आसिफ शेख :-**

या संदर्भात आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यायलाच लागेल.

**मा. सभापती :-**

या विषयावर आपण नंतर चर्चा करुया.

**आसिफ शेख :-**

आपण स्थायी समिती म्हणनुच मी सांगितले की गव्हर्निंग कमिटी आहे आणि आपण घेणारे निर्णय हे लोकांना परिणामकारक असतो. जर आपण योग्य ती कारवाई घेणार नाही तर मग उपयोग काय?

**मा. सभापती :-**

आपण कोणत्या विषयावर बोलत आहात.

**आसिफ शेख :-**

शहरात बदनामी होते की तुम्ही स्टॅंडिंगला असुन करता काय?

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. १२५ वर बोलतोय चालु विषयावर मला बोलायचे आहे.

**आसिफ शेख :-**

मी नागरिकांच्या हिताच्या दृष्टिकोनातुन बोलत आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेखजी आपली सुचना आपण मघाशी मी या ठिकाणी तुम्हाला रुलिंग दिलेले आहे की ज्या विषयावर आपल्याला बोलायचे असेल तर आपण सभा संपल्यानंतर अगदी महत्त्वाच्या विषयावर त्या अधिकाऱ्यांना बोलावुन मग बोलू आणि त्याची चर्चा करु.

**आसिफ शेख :-**

त्याची नोंद इतिवृत्तांतामध्ये घेऊन त्याच रुलिंग झाले पाहिजे आणि त्यावर निर्णय झाला पाहिजे. विषय घेईपर्यंत नागरिकांनी काय करायचे? नागरिकांना नोटीस देणार का तुम्ही ज्या तातडीच्या आणि अत्यंत महत्त्वाच्या बाबी असल्यावर तातडीने तुम्हाला निर्णय घ्यायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

लोकांना नोटीसा गेलेल्या आहेत. फार मारामाऱ्या लागल्या आहेत.

**आसिफ शेख :-**

आपण सरकारमध्ये सहभागी आहोत.

**मा. सभापती :-**

सन्मा. दोन्ही सदस्यांना माझी विनंती आहे की परस्पर विषयांबाबत बोलू नका.

**आसिफ शेख :-**

अशी सक्ती करता येणार नाही. नागरिकांवर ते नळ कनेक्शनचे पैसे भरायला येतात. बिलाचे पैसे भरायला येतात आणि तुम्ही सांगतात की आम्ही बिल स्विकारणार नाही तुम्ही सगळे सगळे पैसे आम्हाला बरोबर घेऊन या.

**मा. सभापती :-**

आपण शुन्य प्रहरामध्ये हा विषय काढु शकतो. सन्मा. सदस्यांना माझी विनंती आहे की आपण असे जे विषय असतील त्यावर नंतर चर्चा करु.

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. १२५ वर मला बोलायचे आहे. मागच्या वेळेला सुद्धा अशी अग्रीम आपण मंजुर केली होती तरी आता मला सांगा याच्यामध्ये गेल्या वर्षी अग्रीम रक्कम आपण ज्या ज्या लोकांना दिली त्याच्यातली वसुली ही पुर्ण झाली का? त्याचा याच्यात कुठेही उल्लेख नाही आहे. किती रक्कम दिली त्यानंतर वसुल किती झाली बाकी कोणाकडे आहे. ज्यांच्याकडे अग्रीमाची रक्कम बाकी आहे त्यांना परत देणार आहात का? ही माहिती याच्यामध्ये कुठेही आलेली नाही. तरी साहेब याचे डिटेल आम्हाल द्या आणि विषय मंजुर करायला आमची काही हरकत नाही. ह्यांच्यात काय दिले आहे वर्षात गैरहजर निलंबित आणि नविन नियुक्ती असा उल्लेख केलेला नाही. त्यावेळेला ते हजर होते नंतर अग्रीम घेतल्यानंतर गैरहजर राहिले. नंतर निलंबित झाले अशा कर्मचाऱ्यांकडून येणे आहे का? पगारातून रक्कम कट झाली आहे का?

**श्रीकांत मोरे :-**

आपण ही जी अग्रीम रक्कम देत आहेत ती आपण दहा हफ्त्यांमध्ये परत वसूल करतो.

**मिलन म्हात्रे :-**

अग्रीम घेईपर्यंत उपस्थित होतो त्यानंतर ऑगस्ट नंतर निलंबित झाले असे कर्मचारी असतील तर आपण ते बघा व त्यांच्याकडून किती येणे आहे ते देखील बघा.

**श्रीकांत मोरे :-**

माहिती घेऊन आम्ही तुम्हाला सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

असे कर्मचारी किती आहेत त्याबाबत आपण आम्हाला माहिती द्या.

**मा. केळकर सो. (उपआयुक्त) :-**

ज्या कर्मचाऱ्यांचे प्रलंबित असे प्रकरण असतील. ज्यांच्या कडून मागची अग्रीम रक्कम वसूल झाली नसेल. अशा सर्व कर्मचाऱ्यांचे ह्या वेतनातून रक्कम कपात करून त्यानंतर त्यांना पुढील अग्रीम रक्कम देण्यांत यावी.

**मा. सभापती :-**

विषय क्र. १२५ ह्या विषयावर चर्चा झाली व त्या चर्चेत मिलन म्हात्रेजी ह्यांनी सहभाग घेताना असे काही अधिकारी असतील त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही झाली आणि पुन्हा ते कामावर रुजू झाले असतील व ज्यांनी अग्रीम घेतले आहे व त्यांच्या पगारातून ती रक्क्म कपात केले नसतील त्या सर्वांचा अहवाल सादर करून नविन अग्रीम देण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

**प्रकरणे क्र. १२५ :-**

कर्मचाऱ्यांना उत्सव अग्रीम प्रदान करणे बाबत.

**ठराव क्र. १०८ :-**

महानगरपालिकेतील वर्ग-३ व वर्ग-४ च्या स्थायी कर्मचाऱ्यांना गणपतीपुर्वी उत्सव अग्रीम देण्याबाबत कर्मचारी यांच्या कामगार संघटनांनी विनंती केली असून महानगरपालिकेत दरवर्षी गणपती पूर्वी उत्सव अग्रीम देण्यांत येतो.

उत्सव अग्रीम हा वर्षातून एक वेळा कर्मचारी वर्गास विनाव्याजी दिला जात असून सन २००२/०३ या वर्षी प्रदान केलेल्या उत्सव अग्रीमाची वसुली ज्या कर्मचाऱ्यांकडे बाकी आहे त्यांचेकडून वसुली करावी. तसेच २००३-२००४ वर्षात गैरहजर, निलंबीत व नविन प्रतीनियुक्ती कर्मचारी व

थकबाकी असलेले कर्मचारी वगळून शासन निर्णय क्र. मुविनि-१०९८/प्र.क्र.४७/९८/विनियम, दि. ३१/०७/२००० अन्वये ज्या अराजपत्रीत राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे मुळ वेतन रु. ८,३००/- पेक्षा जास्त नाही. अशा महानगरपालिकेच्या ११०० कर्मचाऱ्यांना प्रत्येकी उत्सव अग्रीम रु. १,५००/- एवढी अनुज्ञेय असून दहा समान हप्त्यात वसुल करण्याचे अधिन राहून उत्सव अग्रीम प्रदान करण्यांस मान्यता देण्यांत येत असून येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे. अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२६ चे वाचन केले)

**अनंत पाटील :-**
मोर्वा ब्रम्हदेवनगर येथील रस्ता सी.सी. करणे हे काम नवीन घेणार आहात की हे काम झालेले आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**
मा. आयुक्त साहेबांनी मंजूर केले आहे. हे अवलोकनासाठी स्थायी समिती समोर आणले आहे.

**मा. सभापती :-**
निविदा मंजूर केलेली आहे पण कामाला सुरूवात झाली आहे का?

**शरदचंद्र वैरागडे :-**
होय काम झालेले आहे.

**अनंत पाटील :-**
नगरपालिका असताना डिसेंबर महिन्यामध्ये मोर्वा गावाचे संपूर्ण क्राँकीटीकरण करण्याचे काम चालू होते. परंतू आता हा एवढा वेळ खंडित का झाला.

**मा. सभापती :-**
हे मोर्वा गावातील अंतर्गत काम आहे. ते काम यात्रेला झालेले आहे व ते आता अवलोकनासाठी आपल्या समोर आलेले आहे.

**अनंत पाटील :-**
सी.सी. रस्ते व डांबरी रस्ते असे दोन्ही काम आहे ना.

**मा. सभापती :-**
होय.

**प्रकरण क्र. १२६ :-**
मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे.

**ठराव क्र. १०९ :-**

| A. Ë. | kamaacao naaMva | AMdaijat r@kma | zokodaracao naaMva |
|---|---|---|---|
| 1 | imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka mau#ya kayaa-laya [maartIt drvaajao¸ iKD@yaaMcaI iT/TmaoMT krNao | $.49¸800À¹ | |
| | A. mao. Aaopla posT kMnT/aola | 2.00‰ jaast dranao | |
| | ba. mao. yauinak posT kMnT/aola | 1.00‰ kmaI dranao | |

| | | | |
|---|---|---|---|
| | k. mao. posTIsaola | 3.00‰ jaast dranao | |

varIla pOkI mao. yauinak posT kMnT/aola yaaMcaI AMdajap~katIla drapoxaa 1.00‰ kmaI dracaI inaivada maMjaUr krNyaat AalaolaI Aaho.

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | p`Baaga Ë.12 poNakr paDa saRYTI ka^mPlao@sa yaoqao paoilasa caaOkI baaMQaNao ³nagarsaovak inaQaI´ | $. 6¸43¸390À¹ | |
| | A. mao. inalaoSa [MTrp`ayajaosa | 3.00‰ jaast dranao | |
| | ba. mao. Ao vana knsT/@Sansa | 0.20‰ kmaI dranao | |
| | k. mao. laa[-T ha}sa knsT/@Sansa | 7.50‰ jaast dranao | |

varIla pOkI mao. Ao vana knsT/@Sansa yaaMcaI AMdajap~katIla drapoxaa 0.20‰ kmaI dracaI inaivada maMjaUr krNyaat AalaolaI Aaho.

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | raYT/Iya mahamaaga- Ë.8 var Aijat p^laosa ha^Tola samaaor pa[-p D/ona baaMQaNao. | $. 2¸05¸000À¹ | jaya iSavaraya majaUr kamagaar sah. saMsqaa |
| 4 | ima.Baa. mahanagarpailaka h_It ivaivaQa ivaBaagaat rsto Ëa^isaMga kirta Aar.saI,.saI. pa[-p purvaza krNao. | $. 4¸75¸809À¹ | mao. gaNaoSa majaUr kamagaar sah. saMsqaa ila. |
| 5 | Baa[-Mdr ³pUva-´ yaoqao rivaraja [MDsT/Iyala [sToT samaaor saI.saIO. gaTar baaMQaNao. | $. 1¸38¸878À¹ | mao. gaganaigarI majaUr kamagaar sah. saMsqaa ila. |
| 6 | Baa[-Mdr ³pUva-´ svastIk [MD. [sToT maQaIla gaaLa naM jao. 14 pasaUna [MDIyaa sTIla gaaLa naM ema 12 pya-t saI.saI. gaTar baaMQaNao. | $. 1¸36¸740À¹ | mao. gaganaigarI majaUr kamagaar sah. saMsqaa ila. |
| 7 | Baa[-Mdr ³pUva- ´ yaoqao ivakasa [MDsT/Iyala maQaIla inama-la ha^Tola samaaor saI.saI. gaTar baaMQaNao. | $. 50¸939À¹ | mao. saa[-Svar kamagaar sah. saMsqaa ila. |
| 8 | Baa[-Mdr ³pUva- ´ e¹vana [MD [sToT maharaYT/ [MijainaArIMga laagaUna saI.saI. gaTar | $. 49¸681À¹ | mao. saa[-Svar kamagaar sah. saMsqaa ila. |

| | | | |
|---|---|---|---|
| | baaQaNao. | | |
| 9 | kaiSaimara raoD vaolaMknaI<br>Aa^Tao saivh-sa esa.vhI.pI.<br>Aa^TaojavaL saI.saI. gaTar<br>baaMQaUna sla^ba TakNao. | $. 52¸024À1 | mao.<br>icaMtamaNaI<br>majaURr<br>kamagaar sah.<br>saMsqaa ila. |
| 10 | Baa[-Mdr 3pUva- ´ yaoqao ivakasa<br>[MDsT/Iyala maQaIla inama-la<br>ha^Tola samaaor saI.saI. gaTar<br>baaMQauna sla^ba TakNao. | $. 21¸130À1 | mao.<br>icaMtamaNaI<br>majaURr<br>kamagaar sah.<br>saMsqaa ila. |
| 11 | Baa[-Mdr 3\p ´ DaoMgarI yaoqao<br>vyaayaama SaaLocao vaaZIva<br>baaMQakama krNao. | $.<br>3¸74¸502À1 | mao. gaNaoSa<br>majaUr<br>kamagaar sah.<br>saMsqaa ila. |
| 12 | maaovaa-gaava ba`amhNadova<br>nagar yaoiqala mau#ya rsta<br>saI.saI. krNao. | $.<br>4¸97¸651À1 | mao. haotk$<br>majaUr<br>kam,agaar sah.<br>saMsqaa ila. |
| 13 | maaovaa- yaoiqala AMtga-t<br>saI.saI. rsto tyaar krNao. | $.<br>4¸99¸943À1 | mao. haotk$<br>majaUr<br>kam,agaar sah.<br>saMsqaa ila. |
| 14 | Da^. hoDgaovaar maaga- esa. ko.<br>sTaona to saaonaalaI ha^Tola<br>pya-t NP3 pa[-p purvaza krNao. | $.<br>4¸95¸000À1 | mao. EaI.<br>majaUr<br>kamagaar sah.<br>sasqaa ila. |
| 15 | Da^. hoDgaovaar maaga- pMjaaba<br>fa}MD/I to esa.ko. sTaona pya-t<br>NP3 pa[-p purvaza krNao. | $.<br>5¸00¸000À1 | mao. C~ptI<br>iSavaajaI<br>majaUr<br>kamagaar sah.<br>saMsqaa ila. |
| 16 | navaGar d<a maMidr to SaryaU<br>smaRtI pya-t naalyaavar sla^ba<br>TakNao. | $.<br>1¸93¸013À1 | mao. navalaa[-<br>majaUr<br>kam,agaar sah.<br>saMsqaa ila. |
| 17 | navaGar gaavadovaI caaL to<br>prSaurama paTIla caaL yaoqao<br>saI.saI. gaTar baaMQaNao. | $.<br>2¸25¸273À1 | mao. navalaa[-<br>majaUr<br>kam,agaar sah.<br>saMsqaa ila. |
| 18 | imara gaaMva ema.Aaya.DI.saI,.<br>yaoqaIla DoArI javaL saI.saI. | $.<br>2¸27¸892À1 | mao.<br>jayaiSavaraya |

| | | | |
|---|---|---|---|
| | Ëa^sa D/ona baaMQaNao. | | majaUr kamagaar sah. saMsqaa ila. |
| 19 | ra.ma.Ë. 8 varIla janatanagar yaoqaIla jarImarI tlaavajavaL saI.saI. Ëa^sa D/ona baaMQaNao. | $. 59¸231À¹ | mao. rGauivar majaUr kamagaar sah. saMsqaa ila. |
| 20 | GaaoDbaMdr yaoqao basa sTa^p to rajaa iSavaajaI ivadyaalayaapya-t DaMMbarIkrNa krNao. | $.3¸80¸500À¹ | mao. ivalaasa majaUr kamagaar sah. saMsqaa ila. |
| 21 | manapa mau#ya kayaa-laya maagaIla caca- raoD DaMbarIkrNa krNao | $.3¸00¸000À¹ | mao. ivalaasa majaUr kamagaar sah. saMsqaa ila. |
| 22 | Baa[-Mdr ³pU´ rahula pak- rahula iT/ma 'Ao' to saoMT maorI hayaskula pya-t gaTar baaMQauna sla^ba TakNao. | $.2¸12¸350À¹ | mao. navalaa[- majaUr kam,agaar sah. saMsqaa ila. |
| 23 | Baa[-Mdr ³pUva- ´ navaGar raoD naalaMda ha^Tola samaaor saoMT AlaayasaIsa hayaskulacyaa baajaulaa saI.saI. gaTar baaMQauna sla^ba TakNao. | $.2¸13¸000À¹ | mao. navalaa[- majaUr kam,agaar sah. saMsqaa ila. |
| 24 | Baa[-Mdr ³pUva- ´ p`Baaga Ë.6 jaosalapak- yaoqao maoGanaa to Amarivalaa ka^mPlao@sa va Aar.ena.pI. pak- samap-Na to jaya jayaoSa [maartI pya-t gaTar du$stI krNao. | $.2¸13¸078À¹ | mao. jayaiSavaraya majaUr kamagaar sah. saMsqaa ila. |
| 25 | Baa[-Mdr ³pUva- ´ p`Baaga Ë. 24 isaQdI ivanaayak ibalDIMga sauMdr ApaT-maoMT va baaLkRYNa ilalaa rsta isamaoMT ka^ËIT krNao. | $.2¸14¸964À¹ | mao. jayaiSavaraya majaUr kamagaar sah. saMsqaa ila. |
| 26 | Baa[-Mdr ³p´ ivanaayak nagar samaaja maMidr du$stI krNao | $.3¸31¸643À¹ | mao. mahalaxmaI majaUr kamagaar sah. saMsqaa ila. |

varIla kamao maa. ijalha ]pinabaMQak zaNao yaaMcao kDIla iSafarsaInausaar saMbaMiQat zokodaraMkDuna k$na GaoNyaat AalaolaI Aahot.

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | hTkoSa ]Vaoga nagar rsta du$stI krNao. | $.9¸97¸650À¹ | |
| 28 | imara raoD SaaMtI pak- saoMT jaaosaof SaaLa rsta du$stI krNao. | $.9¸89¸402À¹ | |
| 29 | baovalaI- pak- laxmaI pak- kDo jaaNaara rsta du$stI krNao. | $.7¸17¸450À¹ | |
| 30 | jaosala pak- ³sabasToSana´ to Aar.ena.pI. pak- T^Mkr pa^[-MT pya-t rsta saaoilaMgasah KDIkrNa DaMbarIkrNa krNao. | $.8¸82¸500À¹ | |
| | A. mao. gaNaoSa Dovhlapasa- | 1.70‰ jaast dranao | |
| | ba. mao. rmaoSa A^nD AsaaoiSaeT\sa. | 2.30‰ jaast dranao | |
| | k. mao. AaSaapura knsT/@Sansa kM | 0.50‰ kmaI dranao | |
| 31 | jaosala pak- ³sabasToSana´ SaojaarIla naalyaalagat rs%yaavarIla saaoilaMgasah KDIkrNa¸ DaMbarIkrNa krNao. | $.5¸19¸130À¹ | |
| | A. mao. gaNaoSa Dovhlapasa- | 1.90‰ jaast dranao | |
| | ba. mao. AaSaapura knsT/@Sansa kM | 0.80‰ kmaI dranao | |
| | k. mao. rmaoSa A^nD AsaaoiSaeT\sa. | 2.25‰ jaast dranao | |
| 32 | jaosala pak- caaOpaTI ivasaja-nakrIta kpacaI¸ ga`IT pavaDr maatI Takuna jaagaa laovhlaIMga krNao. | $. 3¸50¸000À¹ | |
| | A.  mao. AaSaapura knsT/@Sansa k | 2.10‰ jaast dranao | |
| | ba.  mao. gaNaoSa Dovhlapasa- | 1.10‰ kmaI dranao | |
| | k.  mao. rmaoSa A^nD AsaaoiSaeT\sa. | 3.10‰ jaast dranao | |

varIla tulanaa%mak t@ta pahta zokodaraMnaI saadr kolaolyaa savaa-t kmaI dracyaa inaivada hyaa vaajavaI Aahot. Ë.1 cyaa kamaakrIta zokodar mao.AaSaapura knsT/@Sansa kM. yaaMcaI AMdajap~katIla drapoxaa 0.50‰ kmaI dracaI inaivada Ë.2 cyaa kamaakrIta zokodar mao. AaSaapura knsT/@Sana kM.

yaaMcaI AMdajap~katIla drapoxaa 0.80‰ kmaI dracaI inaivada Ë.3 cyaa kamaakrIta zokodar mao. gaNaoSa Dovhlapsa-yaaMnaI saadr kolaolaI AMdajap~katIla drapoxaa 1.10‰ kmaI dracaI inaivada¸ hyaa vaajavaI Asauna maMjaUr krNyaat Aalaolyaa Aahot

varIla sava- p`stavaacao Avalaaokna krNyaat Aalao.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. नितीन ठाकुर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२७ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

ही जी बायडिंगजी साईज दिली आहे, ती साईज कळत नाही. बायडिंगची वरची साईज मोजमाप केले आहे का? कारण त्यावरचे कागदी आवरणे पुठ्ठा त्यांची साईज दिलेली नाही. बायडींग म्हणजे त्याच्यावरचा पुठ्ठा, कागदी आवरण त्याची साईज इथे दिलेली नाही. माझ्या मते लांबी असेल सहा इंच. तर आपले सहा इंचाचे कोणते रजिस्टर आहे.

**संजय गोखले :-**

सर्व साईज घेतली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझा सागायचा दृष्टिकोन असा आहे. सहा बाय तीन इंच जो आहे त्याची लांबी रूंदी पण पाहिजे. कारण तो ते काम करणार आहे किंवा तो टाके टाकून देईल आणि सांगेल हे झाले सहा बाय तीन इंच

**संजय गोखले :-**

आपण रजिस्टर, पावती पुस्तक पुर्ण बायडिंग करून घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

स्टीचिंग साईज आहे. तीन बाय सहा आणि टोटल वर्किंग दहा बाय अकरा ही साईज पाहिजे ह्याची आपण नोंद करून घ्या.

**नितीन ठाकूर :-**

साहेब मी बोलू का? आमच्या प्रभागाचे काम १२६ मध्ये निघाले आहे ते काम सांगायचे राहून गेले.

**मा. सभापती :-**

आपण आता बोला लक्षात ठेवा पण विषय मंजूर झाल्यानंतर पुन्हा त्याचर्चेमध्ये भाग घ्यायचा नाही.

**नितीन ठाकूर :-**

महानगरपालिकेच्या पाठीमागे चर्चचा रस्ता डांबरीकरण आहे पण तो सी. सी. करायचा आहे. ती दुरूस्ती करावी.

**आसिफ शेख :-**

मागच्यावेळी हा विषय जेव्हा मा. महासभेत आला होता. त्यावेळी आम्ही त्यात दुरूस्ती केलेली आहे. डांबरीकरण दिले आहे. त्याचे सी.सी. करण करण्यांत यावे.

**मिलन म्हात्रे :-**

माझी अशी सूचना आहे. आपण तिथे गटार करावे.

**आसिफ शेख :-**

होय, गटार देखील बनवायचे सांगितले आहे.

**मा. केळकर सा. (उप आयुक्त) :-**

२१ नंबरमध्ये डांबरीकरण ऐवजी सी.सी. करणे अशी दुरूस्ती करावी.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब हा जो दप्तर बायडींगचा विषय आहे. तर तो पुर्ण वर्ष भराचा विषय आहे का?

**मा. सभापती :-**

होय पुर्ण वर्षभराचा विषय आहे.

**धनराज अग्रवाल :-**

किती रजिस्टर असतात.

**संजय गोखले :-**

गेल्यावेळेला पन्नास, साठ हजार रूपये खर्च झाला होता.

**धनराज अग्रवाल :-**

अंदाज माहिती असेल ना.

**संजय गोखले :-**

लाख बिले निघाली होती.

**मा. सभापती :-**

हो विषय मंजूर आहे. असे विषय आणताना मागील वर्षाचा साधारण अहवाल आणायला पाहिजे. टिपणी सोबत नाही दिला तरी चालेल पण असा अहवाल सभेत आणायचा .

**दिनेश नलावडे :-**

सभापती माझा एक विषय आहे. प्रकरण १२६ मध्ये २२ नंबर राहुल पार्कचे काम आहे. येथे दिले आहे. गटर बांधून स्लॅब टाकणे. पण माझ्या अंदाजप्रमाणे ह्याच्या वरती फक्त स्लॅब टाकलेला आहे. आपण त्याची चौकशी करा.

**मा. सभापती :-**

काही वेळेला आपण काम देतो गटारावर स्लॅब टाकणे पण तिथला स्थानिक नगरसेवकांची सुचना असते. त्या सुचनां घेऊन काम केले जाते. पण तसे झाले नसेल तर त्यास्थानिक नगरसेवकांचा ऑब्जेक्शन असेल तर आपण तसा अहवाल मागून घेऊ.

**रिटा शहा :-**

नगरसेवक निधीमधले जे काम चालू आहे. त्याचा ठराव आपण येथे आणला आहे. आमच्या प्रभाग क्र. २१ मध्ये नगरसेवक निधीचे काम सुरू आहे. पण त्याचा येथे उल्लेख नाही आणि दुसरे भाईंदर पश्चिमेला जाळी बसविण्याचे आहे. त्याच्यामध्ये आमच्या येथे पण जाळ्या बसवायच्या आहेत. ते कसे काय करायचे. आता मिलन म्हात्रे साहेब बोलले त्यांनी त्या ठेकेदाराला विचारल्यावर त्याने सांगितले की माझ्याजवळची कॉन्टीटी संपली आहे. आमच्या प्रभागात जाळी बसवायची आहे. तर परत आम्हाला पत्र द्यावे लागेल का परत असा विषय आणावा लागेल. मला अजून कामाची पद्धत समजत नाही. काम व्हायच्यानंतर येतो कि काम सुरु व्हायच्या नंतर आपण मंजुरी देतो.

**मा. सभापती :-**

काही कामे सुरूही असतात व काही कामे पुर्ण ही होतात. त्या दरम्यान जर अर्जन्ट असेल व काम करून घेतले आपण तर त्याला कमीशनर साहेबांच्या अखत्यारिची बाब असते दहा लाखाच्या आतमध्ये जी कामे अशी अर्जन्ट असतात. ती कामे परस्पर देऊन नंतर सभागृहाच्या मंजूरी घेतात.

**रिटा शाह :-**

आम्ही आता मागणी केली की, आमच्या प्रभागामध्ये काही ठिकाणी जाळ्या बसवायच्या आहेत. तर आजच्या सभेत ते मंजुर होणार काय.

**मा. सभापती :-**

आजच्या सभेत मंजुर होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या शहरामध्ये आपण जे झाकण लावायचे प्रकार करतो. आपल्या इकडची लोखंडी वजनी झाकणं चोरीला जातात. माझ्या वार्डचे गेले आहे आणि मी तक्रारही केली आहे. आपल्याकडे याबाबत पोलिस कम्प्लेंट किती झाले आहे ते सांगा आणि ती झाकणे आपल्याला जे ठेकेदार पुरवतात त्यांच्याच वर्कशॉपमध्ये विकली जातात.

**मा. सभापती :-**

आपण तक्रार दिली आहे. ह्याच्यावर आपण तपशिल मागवा आणि दुसरा विषय असा आहे की ह्या जाळ्यांचा विषय निघाला जाळीचे आपण पॅटन साईज फिक्स करा. सिटी इंजिनिअर साहेब आणि सी.सी.चे साईज फिक्स करा. म्हणजे त्या जाळ्या चोरी होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

डी.एम.सी. साहेब माझी सूचना अशी होती की जसे दहिसरला बी.एम.सी.ने लांब्या वजनी प्लेट बनविल्या आहे व स्लॅपच्या ऐवजी त्या टाकतात. सफाई करताना काढुन घेतात व परत टाकतात.

**नितिन ठाकूर :-**

साहेब, तुम्ही त्याच्यावर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रिमार्क मारा.

**मा. सभापती :-**

एम.एस.ची जाळे बंद करुन यापुढे सी.सी. करण्यात यावे.

**प्रकरण क्र.१२७ :-**

महानगरपालिका कार्यालयीन दप्तर बाईंडिंग करणे.

**ठराव क्र. ११० :-**

महानगरपलिका कार्यालयीन दप्तर बायडिंग करणेबाबत दि. २९/६/२००३ दै. आपला वर्ताहार या वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली होती. त्यानुसार एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या परंतु निविदेतील दर समान असल्याने संबंधित ठेकेदारंना चर्चेसाठी बोलाविले असता, चर्चेतुन सदर ठेकेदाने खालीलप्रमाणे मंजुर दरानुंससार काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

| अ.क्र. | तपशिल | गिरीश प्रिंटरी | श्वेता प्रिंटींग प्रेस | सुधारित मंजुर दर |
|---|---|---|---|---|
| अ) | विविध प्रकारची रजिस्टर/बुके साधे कापडी शिलाईसह रिबायडींग / बायडींग करणे. | | | |
| | १) साईज "३ x ६" | ३०/-प्र. नग | ३०/-प्र. नग | १५/-प्र. नग |
| | २) साईज ४"x ७" | ४२/-प्र. नग | ४२/-प्र. नग | २४/-प्र. नग |
| | ३) साईज ५ १/२"x ६ १/२" | ५०/-प्र. नग | ५०/-प्र. नग | २५/-प्र. नग |
| | ४) साईज ५ १/२" x ८ १/२" | ५०/-प्र. नग | ५०/-प्र. नग | २५/-प्र. नग |
| | ५) साईज ६ १/२" x ८ १/२" | ५१/-प्र. नग | ५१/-प्र. नग | २५.५०/-प्र. नग |
| | ६) साईज ७ १/२" x ८ १/२" | ५२/-प्र. नग | ५२/-प्र. नग | २६/-प्र. नग |
| | ७) साईज ७ १/२" x ९ १/२ " | ५५/-प्र. नग | ५५/-प्र. नग | २७.५०/-प्र. नग |
| | ८) साईज ७ १/२" x १२ १/२" | ६०/-प्र. नग | ६०/-प्र. नग | ३०/-प्र. नग |
| | ९) साईज ९" x ११" | ६२/-प्र. नग | ६२/-प्र. नग | ३१/-प्र. नग |
| | १०) साईज ८ १/२" x १३ १/२" | ६५/-प्र. नग | ६५/-प्र. नग | ३२.५०/-प्र. नग |
| | ११) साईज १०" x १२" | ७०/-प्र. नग | ७०/-प्र. नग | ३५/-प्र. नग |
| | १२) साईज १०" x १५" | ७५/-प्र. नग | ७५/-प्र. नग | ३७.५०/-प्र. नग |
| | १३) साईज १३" x १७" | ८५/-प्र. नग | ८५/-प्र. नग | ४२.५०/-प्र. नग |
| | १४) साईज १५" x २०" | ८५/-प्र. नग | ८५/-प्र. नग | ४२.५०/-प्र. नग |
| | १५) साईज १८" x २०" | ९०/-प्र. नग | ९०/-प्र. नग | ४५/-प्र. नग |
| | १६) साईज १२" x १४" | ८०/-प्र. नग | ८०/-प्र. नग | ४०/-प्र. नग |
| ब) | विविध प्रकारची रजिस्टर/बुके साधे कापडी सेक्श्न शिलाईसह रिबायडींग / बायडींग करणे. | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | साईज "३ x ६" | ४०/-प्र. नग | ४०/-प्र. नग | २०/-प्र. नग |
| २) | साईज ४"x ७" | ५५/-प्र. नग | ५५/-प्र. नग | २७.५० /-प्र. नग |
| ३) | साईज ५ १/२"x ६ १/२" | ६०/-प्र. नग | ६०/-प्र. नग | ३०/-प्र. नग |
| ४) | साईज ५ १/२" x ८ १/२" | ६०/-प्र. नग | ६०/-प्र. नग | ३०/-प्र. नग |
| ५) | साईज ६ १/२ " x ८ १/२" | ६०/-प्र. नग | ६०/-प्र. नग | ३०/-प्र. नग |
| ६) | साईज ७ १/२" x ८ १/२" | ६५/-प्र. नग | ६५/-प्र. नग | ३२.५०/-प्र. नग |
| ७) | साईज ७ १/२" x ९ १/२" | ६५/-प्र. नग | ६५/-प्र. नग | ३२.५०/-प्र. नग |
| ८) | साईज ७ १/२" x १२ १/२" | ७०/-प्र. नग | ७०/-प्र. नग | ३५/-प्र. नग |
| ९) | साईज ९" x ११" | ८०/-प्र. नग | ८०/-प्र. नग | ४०/-प्र. नग |
| १०) | साईज ८ १/२ " x १३ १/२" | १०५/-प्र. नग | १०५/-प्र. नग | ५४.५०/-प्र. नग |
| १२) | साईज १०" x १२" | ११०/-प्र. नग | ११०/-प्र. नग | ५५/-प्र. नग |
| १२) | साईज १०" x १५" | ११५/-प्र. नग | ११५/-प्र. नग | ५७.५०/-प्र. नग |
| १३) | साईज १३" x १७" | १३०/-प्र. नग | १३०/-प्र. नग | ६६/-प्र. नग |
| १४) | साईज १५" x २०" | १३५/-प्र. नग | १३५/-प्र. नग | ६६/-प्र. नग |
| १५) | साईज "१८x २०" | १४०/-प्र. नग | १४०/-प्र. नग | ७०/-प्र. नग |

उपरोक्त निविदामधील सुधारीत दराने मे. गिरीश प्रिंटरी व श्वेता प्रिंटींग प्रेस यांच्या निविदा स्विकारुन काम विभागुन देण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ कलम ७३ नुंसार ही सभा मंजूरी देत आहे

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२८ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, आपण ह्याच्यामध्ये फक्त वृत्तपत्र, मासिके, साप्ताहिके, दिवाळी अंक एवढेच नमूद केले आहे. पण दोन वाचनालये आहेत ते त्यांनी याच्यात मेन्शन केले नाही. एक वृत्तपत्र वाचनालय आणि दुसरे वाचनालय आपले वरती आहे. तिथे आपण पैसे घेऊन लोकांना अनेक वर्षापासुन सुविधा देतोय. माझी अशी आपल्याला सूचना आहे की आपण जेव्हा ह्या ठिकाणी काय काय ठेवायला पाहिजे. तर आपल्याकडे संगणकाविषयी बहुतेक ज्ञान दिवसेंदिवस वाढतेय ते आणि कायदेशीर प्रक्रियेमधील पुस्तक आहे. आता मला ह्या विषयावर अगदी बोलायचे आहे. आपल्या महानगरपालिकेकडुन एम.एम. ॲक्ट ४९ सर्व्हिस केला गेला. त्यावेळी मराठी वृत्तपत्रातुन सव्वाशे कॉपी ॲमेंडमेंटच्या पुस्तिका दिल्या गेल्या नगरपालिकेला. पण महानगरपालिकेकडुन आम्हाला अजुन त्या पुस्तिकेच्या कॉपी दिल्या गेल्या नाहीत. त्या पुस्तिकामध्ये ज्या त्रुटी राहिल्या होत्या किंवा जे नियम सुधारले त्याचा सेट आपल्याकडे आला पण आम्हाला अजुन मिळालेला नाही. जर या वाचनालयामध्ये आपल्याला नविन कुठली पुस्तके घ्यावी लागतील. डी.एम.सी. साहेब आपण स्वतः खालच्या अधिकाऱ्यांवर विसंबुन राहू नका. सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध करुन द्या.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

पुस्तके उपलब्ध करण्यात येतील.

**मिलन म्हात्रे :-**

आपण ह्या ठरावामध्ये जरा सुधार करुन घ्या. वर्तमानपत्रामध्ये गुजराती हिंदी भाषिक लोक आहेत. परंतु त्या त्या भाषेची मासिक हे नसतात. आपली जी महापालिका चालते जसे जैन, गुजराती,

मारवाडी हा समाज आहे त्यांच्या भाषेतील सुद्धा मासिके, पुस्तके येतात. त्याच्यातील जे काही चांगली पुस्कते आपण ठेवा. अशी पुस्तके उपलब्ध नसल्यामुळे जो वाचक आहे तो फिरकत नाही. माझी ही सूचना आहे ती आपण ह्याच्यात ॲड करुन घ्या. व ह्या ठरावात काय सुधार करायचा आहे तो करा व नंतर हा ठराव पास करुन घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी सूचविलेल्या सूचनेसहित हा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२८ :-**

महानगरपालिका मुख्य कार्यालयांत, नगर वाचनालय वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, दिवाळी अंक उपलब्ध करणेकामी निविदेत मंजुरी देणे.

**ठराव क्र. १११ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात नगरवाचनालय वृत्तपत्रे, मालिके , साप्ताहिके, दिवाळी अंक आदी पुरवठ्याबाबत दि. ५/५/०३ रोजी निविदा मागविल्या होत्या. त्यानुसार खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | सचिन रविंद्र चिमण | प्रशांत एजन्सी | मनोज जोशी |
|---|---|---|---|---|
| १) | वृत्तपत्रे | ३%सुट छापील किंमतीवर | ५%सुट छापील किंमतीवर | २%सुट छापील किंमतीवर |
| २) | साप्ताहिके | ३%सुट छापील किंमतीवर | ५%सुट छापील किंमतीवर | २%सुट छापील किंमतीवर |
| ३) | पाक्षिके | ३%सुट छापील किंमतीवर | ५%सुट छापील किंमतीवर | २%सुट छापील किंमतीवर |
| ४) | मासिके | ३%सुट छापील किंमतीवर | ५%सुट छापील किंमतीवर | २%सुट छापील किंमतीवर |
| ५) | दिवाळी अंक | ५%सुट छापील किंमतीवर | ८%सुट छापील किंमतीवर | ४%सुट छापील किंमतीवर |

उपरोक्त निविदेतील मे प्रशांत एजन्सी यांनी सर्वात जास्त सुट छापील किंमतीवर देणारी आहे.परंतु मागिल वर्षी सदर कामासाठी १२% सुट छापील किंमतीवर मिळाली होती. त्यानुसार सदरची सुट छापील किंमतीवर कमी असल्याने, संबंधीत ठेकेदारांना वाटाघाटीसाठी बोलाविले असता, मागिल १२% सुट छापील किंमतीवर देणेसंबंधी ठेकेदारांने नकार दिला. त्यानुसार पुन्हा दि.२९/६/२००३ फेर निविदा प्रसिध्द केल्या. त्यानुसार ३ निविदा ठेकेदारांनी मुदतीत सादर केल्या.

| अ.क्र. | तपशिल | के क्रिश्नन | कल्पीत एजन्सी | प्रदीप जेवलीकर |
|---|---|---|---|---|
| १) | वृत्तपत्रो | २%सुट छापील किंमतीवर | ४%सुट छापील किंमतीवर | ३%सुट छापील किंमतीवर |
| २) | साप्ताहिके | २%सुट छापील किंमतीवर | ४%सुट छापील किंमतीवर | ३%सुट छापील किंमतीवर |
| ३) | पाक्षिके | २%सुट छापील किंमतीवर | ४%सुट छापील किंमतीवर | ३%सुट छापील किंमतीवर |
| ४) | मासिके | २%सुट छापील किंमतीवर | ४%सुट छापील किंमतीवर | ३%सुट छापील किंमतीवर |
| ५) | दिवाळी अंक | ४%सुट छापील किंमतीवर | ७%सुट छापील किंमतीवर | ३%सुट छापील किंमतीवर |

उपरोक्त निविदेतील कल्पीत एजन्सी यांचे निविदेतील दर (सुट छापील किंमतीवर) कमी आहेत. परंतु दि. ५/५/०३ रोजी पहिल्या निविदेतील "प्रशांत एजन्सी" ठेकेदाराचे दर (सुट छापील किंमतीवर) जास्त असल्याने, वरील ठेकेदारांना चर्चेसाठी बोलाविले असता, त्यानी गेल्यावर्षीप्रमाणे १२% सुट छापील किंमतीवर काम करण्यास नकार दिला,

दरम्यानच्या काळात नागरिकांच्या तक्रारी, ग्रंथपाल यांचा अहवाल, महानगरपालिकेच्या विषयी येणाऱ्या बातम्याचे कात्रण आदी माहिती उपलब्ध नसल्याने लोकहिताच्या दुष्टीकोनातून सर्वात जास्त सुट छापील किंमतीवर देणाऱ्या प्रशांत एजन्सी यांची निविदा स्विकारण्यास मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार ही सभा मंजुरी देत आहेत. तसेच संगणक उपयोगी नियतकालिके, मासिके त्याचप्रमाणे गुजराती, हिंदी व अन्य भाषेतील मासिके, पाक्षिके व साप्ताहिके खरेदी करुन लोकांच्या व विद्यार्थ्यांच्या वाचनेकामी वाचनालयात उपलब्ध करुन देण्यांस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.१२९ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, १२९ विषयावर माझी अशी सूचना आहे. ह्या विषयपत्रिकेमध्ये पाठीमागे आपण बघा ज्या प्रायव्हेट सोसायटी किंवा संस्थेला द्यायला बघतोय व खेळणी बसु नका असे मी बोलत नाही. ह्या गार्डनमध्ये वीस लाखाची खेळणी बसवु नका असे मी म्हणत नाही. मेहेरबानी करुन माझे सहकार्य नगरसेवकांनी हा असा भ्रम करुन घेऊ नये. परंतु वीस लाख रुपयाची तरतुद करुन जी आपण इलेक्ट्रॉनिक खेळणी बसवणार आहोत. त्याबाबत जर एखादे लायन्स क्लब, रोटरी क्लब किंवा अन्य कुठली संस्था जी लहान मुलांकरिता अपंगांकरिता कामे करते. अशा काही संस्था जर सेवाभावी संस्था खेळणी वगैरे काय देत असतील व ह्याच्यामध्ये इलेक्ट्रीक फिटींगचा आपण जो उल्लेख केला. माझ्या माहितीनुसार या खेळण्यांना मेन्टेनन्स फार महत्त्वाचा आहे. कारण माझ्या वॉर्डमध्ये जे गार्डन आहे तिथे डेकोरेटिव्ह लॅम्प आहेत. सभेत शेखर हे बसले आहेत त्यांना मी दहा बारा वेळा सांगितले हे लॅम्प तुटलेले आहे. पण अजुनपर्यंत ते लॅम्प चांगले झालेले नाही. ही दयनीय अवस्था महानगरपालिकेच्या गार्डनमधली आहे. नगरभवन समोर जे गार्डन आहे तिकडे हायपावर टेंशनचे जंक्शन बॉक्स आतमध्ये आहे त्या बॉक्सला अजुन टाळे लावण्यात आलेले नाही आहे. अशा ह्या इलेक्ट्रीक फिटींगच्या बाबतीत आपण संस्थेला काम दिले तर संस्था तिथे आपला एखादा माणूस ठेवेल व महानगरपालिकेला चांगल मेनटेन्सस मिळेल व त्या गाउर्नमध्ये देखरेख राहिल व खेळणी देखील चांगल्या प्रतीची लहान मुलांना खेळायला मिळतील. असे मला वाटते, इलेक्ट्रीक खेळण्यांच्या बाबतीत जी महागडी खेळणी असतात. ती खेळणी ते अपंग स्वतः खरेदी करु शकत नाही. बँकेतून लोन काढले तर ते त्याला परवडणार नाही कारण मुलांचे प्रमाण हे काही ठराविक महिन्यांपुरतेच जास्त असते व अन्यथा पावसाळ्याचे चार महिने जातच नाही. आपण ह्या सगळ्यांचा विचार करा व बघा हे वीस लाखाचे काम आपल्याला कुठल्या संस्थेला देता आले तर अन्यथा आपण दुसरा मार्ग काढा.

**मा. सभापती :-**

हा विषय अवलोकनाचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नाही, विषय मंजुरी करिता आला आहे. अवलोकनाकरिता नाही.

**मा. सभापती :-**

आपण येथे जी सूचना मांडली त्या सूचनेचा आणि ह्याविषयाचा येथे काही संबंध नाही. आणि मी संबंधित सर्व खात्यांना ह्याठिकाणी सांगु इच्छितो असे स्पेसिफाय एका विषयाकरिता आपण असे विषय आणु नका. संपूर्ण ज्या बजेटमध्ये आपल्याला स्पिरश्युमेंट करायचे आहे. आपल्याला जसे आरोग्याचे, पाण्याचे, बांधकामाचे असू दे. सचिवजी आपण एक सभा माझ्या उपस्थितीमध्ये बोलावुन घ्या. व त्यावेळी सर्व संबंधित खात्याची माहिती मागवुन घ्या. व प्रत्येक खात्याची मागणी घ्या. आणि मागणीवरुन आपण तो विषय पूर्णपणे हाताळू व सभेस आपण मंजुरीकरिता घेऊन येऊ या. म्हात्रेजी आपण जर सूचना मांडली तो विषय वेगळा आहे आणि हा आताचा विषय वेगळा आहे.

**आसिफ शेख :-**

तोपर्यंत हा विषय स्थगित ठेवायचा आहे का ?

**शरद पाटील :-**

भाईंदर पूर्वेला जे एकमेव गार्डन आहे, व्येकटेश्वर नगरचे. तुम्ही त्याच्यावर कधी विचारच करत नाही.

**आसिफ शेख :-**

शरद पाटीलजी आपल्या ज्या भावना आहेत तशीच भावना सभापतींची देखील आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय पुढे घेण्यात येत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

हा विषय मागे आला होता इलेक्ट्रीक खेळणी बसुन घेणेबाबत. आपण त्यावेळी काय रुलिंग दिली होती. तेव्हा आपली अशी रुलिंग आहे की, इलेक्ट्रीक खेळणी सामाजिक संस्थेने बसवुन दिली तर आपण त्या अपंग किंवा विधवेला ज्यांना चालवायला देणार आहे त्यात नगरपालिका खर्च करणार नाही. मग तुम्ही आता नगरपालिकेचे वीस लाख रुपये खर्च करणार आहात. तर आमच्या प्रभागामध्येही गार्डन आहे मग आम्ही देखील प्रस्ताव आणु.

**मा. सभापती :-**

सर्व प्रस्ताव एकत्र आणायचे आहे. आणि मघाशी इलेक्ट्रॉनिक खेळणीबद्दल बोललात तर आपण असे ठरविले होते की जे इलेक्ट्रॉनिक खेळणी आहे त्याकरिता महानगरपालिका खर्च करणार नाही. हा जो विषय आता सभेसमोर आणलेला आहे. तो विषय पुढे घेण्याचे ठरले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण हा विषय रद्द केला का?

**मा. सभापती :-**

सदरचा विषय ह्या सभेत रद्द करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र.१२९ :-**

पुर्वनियोजन पत्रकास मंजुरी मिळणेबाबत.

(मा. सभापतींच्या आदेशानुसार सदरचा विषय रद्द करण्यांत आला.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.१३० चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, मा. उपआयुक्त साहेब सालासार हनुमान सेवा संघ मुंबई ह्या संस्थेने आपल्याकडे परवानगी मागितलेली आहे व त्याच्यासोबत जी कागदपत्रे जोडलेली आहे. त्याच्यामध्ये कोर्टाची काही कागदपत्रे आहेत. मग त्यांना त्याची प्रॉपर्टी दाखविण्याकरिता केलेले आहे का? हे कळत नाही. परंतु कोणीतरी अनधिकृत बांधकाम केलेले आहे आणि त्याच्यावर स्टे घेऊन ती प्रॉपर्टी आपली आहे असे दाखविण्याचा प्रयत्न झालेला दिसतोय. कारण त्याच्यावर तात्पुरते स्वरुपाचे इंजेक्शन दिलेले आहे व तशी नोंद आहे. हे पेपर त्यांनी का जोडले आहे ते मला काहीच कळत नाही. आपण महापालिकेमार्फत किंवा गॅमन इंडियाच्या मार्फत भाईंदर पुर्वेच्या चौपाटीवर खूप खर्च केलेला आहे. आणि विकास करण्यासाठी संपूर्ण भाईंदरचे एक चांगले काम की भविष्यातील कित्येक पिढ्यांना एक चांगले प्रेक्षणिय असे स्थळ आपण महापालिकेतर्फे करत आहोत. आणि मला वाटतं त्याच्यामध्ये इतर कोणाला सामिल करण्यापेक्षा महापालिकेमार्फतच काम व्हावे. हे जे सालासार हनुमान मंडळ आहे ह्यांना गार्डन विकसित करण्यासाठी किंवा इतर जे काही आहे ते विकसीत करण्याची कामे दया. चौपाटी विकासामध्ये आणि विर्सजनाचा घाट ह्याच्यामध्ये कुठेतरी पुन्हा फेरबदल होत राहिल. आत्ताच काही वेळेपूर्वी चर्चा करताना एका अधिकाऱ्याने अशी माहिती दिली की, अशीच एक घटना भिवंडी महानगरपालिकेत झाली सार्वजनिक संस्थेने घाट बांधला होता व तो घाट पाण्यामध्ये वाहुन गेला. तसा प्रकार आपल्याकडे होऊ नये व हे काम अतिशय जबाबदारीचे आहे. आणि हे काम महापालिकेच्या मार्फत केले तर अधिक योग्य राहिल असे मला वाटते. गणपती विर्सजनाकरिता महानगरपालिकेमार्फत मोठ्याप्रमाणावर खर्च चालु आहे आणि अतिशय चांगल्या पद्धतीने काम चालु आहे. पोलिसांना विश्वासात घेऊन महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्याठिकाणी पाच/दहा विझीट दिल्या असेल. हे काम आहे ते अशा कोणत्या संस्थेला न देता महानगरपालिकेमार्फत करावे व त्या संस्थेला इतर कुठले काम द्यावे अशी माझी सूचना आहे.

**रिटा शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सदर संस्थेने आपल्याकडे साधारणतः जी परमिशन मागितली आहे. त्यानंतर हे जे इंकम टॅक्सचे सर्टिफिकेट आहे हे त्यांनी ह्या सभेमध्ये विषय निघाल्यानंतर बहुतेक अप्लाय केलेले आहे असे मला वाटते. कारण त्याच्यात तारीख आहे. २०/६/२००३ आणि माझ्या माहितीनुसार जुन महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये हा विषय आला होता. त्यांनी ७ नंबरला कॉलम टाकला आहे. सदर सर्टीफिकेट तुम्हाला व्यापारी तत्वावर व्यापारीकरण्याकरिता देता येणार नाही व त्याचा वापर तुम्हाला कुठेही करता येणार नाही असे मेन्शन केले आहे व कामाच्या गॅरंटीबद्दल सांगायचे तर त्यांनी नुसता प्रस्ताव दिला आहे. कुठला आर्किटेक्ट त्यांनी नेमला आहे? ते पायलिंग करणार आहेत का? भराव कसा करणार आहेत का? धक्का कसा बांधणार आहे, नुसता सी.सी.चा बांधणार आहे का? अशी सविस्तर माहिती त्यांनी काहीच दिलेली नाही. ह्या संपूर्ण गोष्टीचा विचार करायला पाहिजे. आज बावीस तारीख आहे व ३१/८/०३ ला गणपतीला सुरुवात होणार फक्त आपल्याकडे ह्या कामासाठी आठ दिवस राहिले आहे. त्यापेक्षा ह्या गणपतीनंतर काय काम करायचे आहे ते करावे व तुम्हाला जो काय निर्णय घ्यायचा आहे तो आपण घ्यावा. रितसर आर्कीटेक घेऊन चांगले काम होईल असे बघावे व गणेश विर्सजनापुरता हा विषय पेंडींग ठेवावा.

**दिनेश नलावडे :-**

चौपाटीबद्दल वारंवार चर्चा झालेली आहे. पाच सहा दिवसांपूर्वी सिटी इंजिनिअर साहेबांना घेऊन गेलेलो आहोत. आज आपण इथले नगरसेवक आहोत. पण कुठल्याही नगरसेवकांना कल्पना नाही. भविष्यामध्ये कुठलीही अडचण तिथे नको. आपण अधिकाऱ्यांना व नगरसेवकांना एकत्र घेऊन त्या चौपाटीबद्दल एकच आराखडा तयार करा. कोणीतरी एक्स.वाय.झेड व्यक्ती येऊन काहीतरी काम सांगतोय. आज जो ग्राऊंड आहे. त्याच्यामध्ये रस्ता बनविला होता. साहेब आपण कुठला तरी एक रोड घ्या, जेणेकरून चौपाटी पूर्णपणे चांगल्याप्रकारे मोठी मिळेल. भाईंदर पूर्व, मिरारोडपासून आपण पाहणी केली तर आपल्या लक्षात येईल तिथे मोठमोठे गणपती येतात व गणपतीला येणारे लोकांची संख्या दिड ते दोन लाख एवढी असते व तिथे मी माणसे थांबु शकत नाही. आपण जर तिथे लक्ष दिले तर तिथे येणारी अडचण आपण दूर करु शकतो. सिटी इंजिनिअर साहेबांना देखील कल्पना नाही की, गाड्या कुठे उभे करणार आहे. सभापती साहेब आपण तिथे पाहणी करुन नागरिकांना होणारा त्रास नाहीसा करावा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी चौपाटीच्या जागेबाबत चांगला सहभाग घेतला आहे. ह्या ठिकाणी ठराव झाला आहे. कुठलीही संस्था महापालिकेला मदत करत असेल, त्या संस्थेचे स्वागत केले पाहिजे. ह्या चर्चेमध्ये भाग घेताना सदस्यांनी असे निर्दशनामध्ये आणली की गणेशोत्सव अतिशय जवळ आलेला आहे आणि सन्मा. सदस्य दिनेश नलावडे ह्यांनी खंत व्यक्त केलेली आहे. मी स्वतः त्या ठिकाणी चौपाटीवर जाऊन आलो. सोबत मा. आयुक्त साहेब होते, पोलिस निरिक्षक, सिटी इंजिनिअर हे सुद्धा होते. नंतर आम्ही त्या जागेवर प्रत्यक्ष आलो व सन्मा. सदस्या रिटा शाह, शानु गोईलजी, सन्मा. सदस्या रांजणकर व सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी ह्यांनी माझ्या दालनामध्ये चर्चा केली. गणपती उत्सव आहे व आपल्याला कायदा व सुव्यवस्थाही पाहिली पाहिजे. गणपती येण्याचा काळ कमी असल्यामुळे व्यवस्था पुर्ण झाली पाहिजे. त्याकरिता त्यांनी स्वतः मा. आयुक्त साहेबांकडे संपर्क साधला व साईडवर जाऊनही आले व काम सुरु झालेला आहे. त्याच्यात काही उणीवा, त्रुटी असतील तर बघावे. तसेच महानगरपालिकेकडे जागा हस्तांतरीत झाल्यानंतर त्याचा प्लान जो आखायचा आहे. त्या प्लानप्रमाणे आपण संपुर्ण खातेनिहाय एकत्र करून जागेवर एकत्र जाऊ. पण सध्या तो रस्ता तात्पुरता (पक्क्या स्वरुपाचा आहे.) पण त्या रस्त्याबद्दल शाश्वता व्यक्त झालेली आहे. चौपाटी करताना ज्या त्रुट्या आपणाला सापडतील त्या त्रुट्या बाजुला करुन त्या परिपुर्ण संपुर्ण चौपाटीचा नकाशा प्लान काढुन ती चौपाटी विकसीत करण्याचा प्रयत्न केलेली आहे. आपण ठराव केलेला व त्यात त्रुटी दाखविली आहे. यापुढे त्यांना संधी दयावी असे मी सन्मा. सदस्यांना अपील आणि आव्हान करत आहे आपण अशी संधी दया. जेणेकरुन महापालिकेचा खर्च वाचेल. गणपती उत्सव अतिशय जवळ आलेले आहेत व आवश्यक बाब लक्षात घेता उपआयुक्त साहेब आपण सांगितल्याप्रमाणे जो घाट आहे तो पूर्ण करुनघ्यावा आणि नजीकच्या काळामध्ये अशी संस्था काम करत असेल व ज्या त्रुटी त्यांच्या आहेत.

त्या त्रुटी दूर करुन सदोष असे प्लान त्यांनी आपल्यासमोर दयावे आणि संस्थेमध्ये अशा कोणत्याही बाबी नसाव्या जेणेकरुन महापालिका अडचणीत येईल.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण आता जे काही रस्ते बनविले गणपती विर्सजनासाठी आपण घाईगर्दीत सर्व काम केलेले आहे. आपण सुशोभिकरणाने जे काम केले आहे ते तात्पुरत्या स्वरुपाचे केले आहे कि कायमचे केले आहे का विर्सजनाकरिता केले आहे?

**मा. सभापती :-**

माझ्या माहितीप्रमाणे सध्या परिस्थितीची व्यवस्था आहे त्याकरिता खर्च पक्क्या स्वरुपाचा आहे.

**रिटा शाह :-**

मी येथे खर्चाचे सांगत नाही.

**मा. सभापती :-**

परंतु ती जी चौपाटी विकसीत करण्याचा आराखड्याचा आपल्याजवळ प्लान आहे. त्याच्यामध्ये तो रस्ता दर्शविलेला नाही आहे. आता जो बनविणार आहे तो रस्ता आराखड्याप्रमाणे टेम्परारी स्वरुपाचा राहणार आहे.

**रिटा शाह :-**

म्हणजे कायम स्वरुपाचा राहणार नाही.

**मा. सभापती :-**

ह्याला कारण सांगतो आपण चौपाटी विकसीत करायची आहे. माझ्यामहितीप्रमाणे मागच्या वेळेला ऐंशी लाखाची तरतुद होती.

**रिटा शाह :-**

मला फक्त आपली रुलिंग पाहिजे होती की, हा रस्ता कायम स्वरुपाचा नाही आहे.

**मा. सभापती :-**

चौपाटीचा आराखडा वेगळा आहे व चौपाटीचा आराखडा समोर ठेवुन हा रस्ता केलेला नाही. गणपती विर्सजन आवश्यकता बाब लक्षात घेऊन आपण हा रस्ता केलेला नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सभापती साहेब मी प्रत्यक्ष १५ ऑगस्ट च्या दिवशी त्या ठिकाणी गेलेलो मी सर्वेचा प्लान आणि डी.पी.ची सांगड घातली तर आपण आता सध्या जो रस्ता डेव्हलप करतोय तो तुमच्या प्लॅनप्रमाणे सद्यस्थितीचा रस्ता नाही आहे. त्याच्या व्यतिरिक्त ज्या जमिनीवर सार्वजनिक कामाकरिता घाट बांधतो. संपूर्णतः जागेची मालकी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे आहे त्याची सुद्धा आपण पडताळणी करावी आणि जर तशी अवस्था असेल तर महानगरपालिकेच्यावतीने आपण त्यांच्या ज्या काही अटीशर्ती असतील त्यावर चर्चा करावी.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब हे जे पेपर जोडले आहेत ते कसले आहेत.

**मा. केळेकर सो. (उप आयुक्त) :-**

गेल्या सभेत आपण त्याच्याकडुन कागदपत्राची मागणी केला होती.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब ह्याच्यामध्ये एका कार्पोरेटरने तक्रार केलेली आहे व त्याच्यानुसार नगरपालिकेने डिमोलेशन केले आहे असे दाव्यामध्ये दिले आहे. नगरपालिकेचे वकील हजर नाही आणि ५०४ मध्ये वकील पत्र दिले आहे त्याची लायबीलीटी आहे की नाही? सभापती साहेब हा मजेचा विषय नाही. नगरपालिकेच्या वतीने गंभीर बाब चालु आहे हे मी निर्दशनास आणु इच्छितो.

**मा सभापती :-**

सन्मा. सदस्य म्हात्रेजी त्यांनीच आपल्या पायावर कुऱ्हाड मारुन घेतली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुम्ही हे रेकॉर्डवर घ्या.

**मा. सभापती :-**

रेकॉर्डवर घेतलेच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

५०४ मध्ये तुमचा वकालत नामा कोणाला दिला आहे? तो वकील या संपूर्ण केसमध्ये गैरहजर आहे. त्याने कागदपत्रे दिलेली नाहीत. त्याने चार माळ्याचे पझेशन दिलेले आहे. मग ते लिगल इलिगल आहे. नगरपालिकेतर्फे प्लान दिला. आपले ॲडव्होकेटला सहकार्य करत नाही. आपली लोक वकीलाकडे जाऊन वकील कोर्टात हजर होत नाही. माझ्या वॉर्डमध्ये असे झालेले आहे. एकाणीस शीटसचे आपण सुलभ शौचालय मंजुर केलेले आहे. दिड वर्ष झाले त्याच्यावर काहीच कारवाई झालेली नाही आणि आपल्या बांधकाम विभागातुन सर्व फाइर्ली चोरुन समोरच्या पार्टीला दिल्या आहेत आणि त्याने फाईली कोर्टात लावल्या आहेत आणि वरुन हे ॲफीडेवीट दिले आहे. त्या फाईलची स्क्रुटनी करायला मिळायली नाही. त्या फाईलचे सर्व कागदपत्र त्याने त्या दाव्याला लावलेले आहेत.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब सन्मा. म्हात्रेजी ह्यांनी जी बाब सांगितली आहे ती गंभीर बाब आहे की फाईली बांधकाम विभागातुन चोरीला जातात. त्या अधिकाऱ्याला आपण निलंबित करू. तुमच्याकडे तसा पुरावा असेल तर आपण आम्हाला सांगावे. आपण जबाबदार स्थायी सदस्य आहात आणि ते सिद्ध झाले तर चौकशीच्या भानगडीमध्ये कोण पडणार नाही. आपण त्या अधिकाऱ्याला सरळ निलंबित करु.

**मिलन म्हात्रे :-**

फक्त खाते प्रमुखांनी सांगावे की फाईल चोरीला गेली नाही. तुम्हाला मी कोर्टातुन सर्टीफाय कॉपी आणुन देतो. त्यांना सस्पेंड करणार? दिड वर्षापासुन मी तारखेला जातो आहे आणि महत्त्वाच्या विषयावर दिड वर्षापासून कोर्टाचा स्टे आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय नामंजुर करण्यात आलेला आहे व ह्या विषयावर मी जे काय सुचना मांडल्या आहेत त्या सुचनांचा आपण समावेश करुन घ्यावा. आणि हा कोर्टाच्या बाबतीत जो विषय आहे त्या विषयावर आपण सभा घेऊन चर्चा करुया. ह्या एका पत्राने गोषवाऱ्यानं ह्या अनुषगांने आपल्याला माहिती मिळालेली आहे. ह्या माहितीवर उपआयुक्त साहेब चर्चेला विषय घेऊन या. अशा पद्धतीची डॉक्युमेन्ट खात्याकडुन कोर्टाकडे जात असतील आणि खात्याचे अधिकारी हलगर्जीपणाने देत असतील. त्यांना ह्या पालिकेचा असा गोपनीय अहवाल किंवा जी माहिति आहे त्या गोष्टीचे त्यांना गांभीर्य नाही आहे असे ह्या ठिकाणी ह्या सभेत चर्चेत निर्देशनास आलेल आहे. व सविस्तर अशी माहिती आपण पुढच्या सभेला आणावी. सदरचा विषय नामंजुर झालेला आहे व अशा ज्याकाही संस्था आहेत त्यांना आपण पुढे संधी देऊ. गणेशोत्सव जवळ आलेला आहे आणि वेळ फार कमी आहे. त्याकरिता तो घाट महानगरपालिकेमार्फत बांधुन घ्यावा. आणि प्लान, एस्टीमेट घेऊन त्या संस्थेला आपण पुढे संधी देऊ.

**याकुब कुरेशी :-**

आता जर महानगरपालिका खर्च करून घाट बांधतच असेल तर त्या संस्थेला पुढे घाट बांधायला दयायचे त्याला अर्थच काय आहे. आणि त्यासंस्थेला पुढे कशाला आणायचे ते समजतच नाही.

**मा. सभापती :-**

आता आपण एक, दोन लाख रुपये खर्च करुन घाट बांधु पण त्या संस्थेने आपल्याला दहा पंधरा लाख रुपये खर्च करुन चांगला घाट बांधुन देण्याचा प्रयत्न करत असेल मोठ्या प्रमाणात आणि चौपाटी ही विकसीत करायचीच आहे आपल्याला व आता आपण घाट तात्पुरत्या स्वरुपाचा म्हणजे गणपतीपुरता करत आहोत. जेव्हा संपूर्ण जागा आपल्याकडे हस्तांतरीत होणार आहे व त्या स्वरुपाचा मोठा घाट जर आपल्याला ती संस्था पंचवीस, तीस, पन्नास लाखाचा घाट करून देत असेल तर त्यांना आपण संधी द्यावी अशी मी सुचना करीत आहे.

**याकुब कुरेशी :-**

त्यांनी जे कागदपत्र गोषवाऱ्यामध्ये दिले आहे त्याची आपण आधी शहानिशा करा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपण बोलता त्यावर मी आधी बोललो आहे. कोर्टाच्या बाबतीत किंवा आणखीन काही त्रुटी असतील त्या सर्व गोष्टीचे क्लेरीफिकेशन झाल्यानंतरच संधी देण्यात यावी. मग ते क्लेरीफिकेशन एक वर्षात हो, दोन वर्षात हो किंवा सहा महिन्यात होऊ दे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब माझी अशी सूचना आहे की, ह्याच संस्थेवर आपण काही नारळ फोडलेला नाही. चौपाटी विकसित करायची आहे व चौपाटीचे सुशोभिकरण करायचे आहे. त्याकरिता भरपुर

संस्था आपल्याकडे आहेत.  सर्व संस्थेला संपर्क करून जी संस्था पुढे येईल त्या संस्थेला आपण प्राधान्य द्यायचे आहे.

**प्रकरण क्र. १३० :-**

भाईंदर पूर्व चौपाटीवर विर्सजन करिता स्वखर्चाने घाट बांधणे कामी श्री. सालासार हनुमान सेवा संघ (मुंबई) या संस्थेस परवानगी देणेबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ११२ :-**

वरील संदर्भिय विषय मा. स्थायी समिती सभा दि. २८/०७/२००३ प्रकरण क्र. ११३ अन्वये विचार विनिमय करीता ठेवला असता मा. स्थायी समितीने सदर कामाबाबत श्री. सालासर हनुमान सेवा संघ (मुंबई) या संस्थेकडील कागदपत्रासह सदर विषय पुढील सभेपूढे ठेवणेबाबत ठराव पारीत करून ठेवला होता. सदर ठरावानूसार सोबत सदर संस्थेने महानगरपालिकेस सादर केलेली कागदपत्रे जोडून सादर केलेली आहेत. परंतू सदर कागदपत्रावरून सदर संस्थेचा मा.न्यायालयात दावा सुरू असल्याबाबत दिसून येते. तसेच सदर संस्थेने स्वखर्चाने बांधावयाच्या विसर्जन घाटाचें आराखडा, डीझाईन सुध्दा तयार करून सादर केलेला नाही. त्यामुळे तुर्तास सदर विसर्जन घाट महानगरपालिकेकडून तातडीने तयार करून घेण्यात यावा तसेच विसर्जन सुरळीत होण्याकरिता विसर्जन ठिकाणी जाण्याकरीता एक दिशा मार्ग तातडीने करण्यात यावा, सदर कामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१) भाईदर (पुर्व) चौपाटीवर विसर्जन घाट बांधणे. रु. ५.०० लक्ष

२) भाईदर (पुर्व) चौपाटीवर नाल्यालगत सध्या सुरू असलेल्या रस्त्यास समांतर (नाल्यालगत) रस्ता विसर्जन घाट पर्यंत तयार करणे. रु. ५.०० लक्ष

वरील प्रमाणे कामें महानगरपलिकेमार्फत तातडीची असल्याने जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्था लि. कडून करून घेण्यात मंजूरी देण्यात येंत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शहा. अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा येथे संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभारी सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**